गुरुवार, १७ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● THURSDAY 17 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-21 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# भाजपने आमदार न फोडता पक्ष उभा करायला शिकावे

## राज ठाकरे : भाजप, राष्ट्रवादी, ठाकरे गटावर जोरदार शरसंधान

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल : चंद्रयान चंद्रावर जाऊन काय उपयोग, तिथे जाऊन खड्डेच बघायचे आहेत, त्यापेक्षा महाराष्ट्र सोडले असते तर खर्चही वाचला असता, असा खोचक टोला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबई-गोवा महामार्ग, तसेच नाशिकमधील रस्त्यांच्या अवस्थेवरुन लगावला आहे. पनवेल इथल्या कोकणातील पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी भाजप, राष्ट्रवादी, ठाकरे गटावर जोरदार शरसंधान साधले. भाजपने दुसऱ्यांचे आमदार न फोडता पक्ष उभा करायलाही शिकावे, असा हल्लाबोल त्यांनी केला. तर खोके खोके ओरडणाऱ्यांकडे कंटेनर आहेत, असे राज ठाकरे म्हणाले.**



मुंबई-गोवा महामार्गप्रश्नी आता मनसे आक्रमक झाली आहे. गणपतीत कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी आता मनसे मैदानात उतरली आहे. या मेळाव्यात प्रलंबित मुंबई-गोवा महामार्गा संदर्भात आंदोलनाची हाक देण्यात आली. असे आंदोलन करा की, यापुढे रस्ते करताना सरकारला अशाप्रकारे आंदोलन झाले होते अशी भीती असावी, दहशत असावी, असे म्हणत राज ठाकरे यांनी या आंदोलनाला हिरवा कंदिल दाखवला.

मेळाव्यात राज ठाकरे म्हणाले की, शिवसेना भाजपा नंतर काँग्रेस-राष्ट्रवादी आली, आता तर सगळेच आले कळत नाही कोण आले. पण लोकांना तुम्ही कसे काय यांना मतदान करतात? आम्ही खड्यातून गेलो काय किंवा खड्यात गेलो काय? महाराष्ट्रातील लोकांना कधीच वाटत नाही का, यांना एकदा धडा शिकवायला हवा, नुसती आश्वासने देतात.

मुंबई-गोवा या रस्त्यावर आतापर्यंत 15 हजार 566 कोटी रुपये खर्च झाला आहेत. रस्ता नाही झाला बाकीच्यांच्या तुंबड्या भरल्या. गडकरी यांच्याशी बोललो.. तर ते म्हणाले कंत्राटदार पळून गेले, काही कोर्टात गेले. यामागे काही कारण तर नाही ना.. कुणाचे काम तर नाही ना कोकणातील जमिनी इतरांच्या घश्यात चालल्या आहेत. नाणार प्रकल्प रद्द होतोय म्हटल्यावर लगेच बारसू प्रकल्प आला. इथे कोणी जमिनी घेतल्या, कोणाच्या नावावर पाच हजार एकर जमीन घेतली. आपलीच लोक आहेत.. कुंपण शेत खाते आपल्या कोकणी लोकांना फसवून दुसऱ्याच्या घशात घालतात.

जवळपास मागील दीड दशकांपासून रखडलेल्या मुंबई–गोवा महामार्गाच्या मुद्यांवरून पनवेलमध्ये निर्धार मेळावा घेतल्यानंतर आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात आक्रमक होणार आहे. मात्र, हे आंदोलन खळ्ळखट्याक पद्धतीने नव्हे तर अभिनव मार्गाने होणार आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांना रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये वृक्षरोपण करण्याचे आवाहन केले आहे. या आंदोलनामुळे तरी प्रशासन जागे होईल, असे राज ठाकरे यांनी म्हटले. पावसाळ्यात दरवर्षी रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. वाहतूक कोंडीपासून ते आरोग्यविषयकही तक्रारी निर्माण होतात. मात्र, खड्ड्यांकडे फारसे लक्ष दिले जात नसल्याचा आरोपही अनेकदा केला जातो. काही दिवसांपूर्वी मनसेने रस्त्यांवरील खड्ड्यांविरोधात सोशल मीडियावर मोहीम चालवली होती. आता, राज ठाकरे यांनी आंदोलनाची हाक दिली आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर रस्त्यावरील खड्ड्यांच्या फोटोसह कार्यकर्त्यांना आवाहन करणारी पोस्ट केली आहे. त्यात राज ठाकरे यांनी म्हटले की, माझ्या महाराष्ट्र सैनिकांना माझं आवाहन आहे की, ह्या राज्यातील कोणताही महामार्ग असो की शहरातील अंतर्गत रस्ते असो, सर्वत्र खड्डेच खड्डे आहेत. तेंव्हा ह्या खड्ड्यांमध्ये झाडे लावा, किमान ह्यामुळे तरी प्रशासनाचं रस्त्यावरच्या खड्ड्यांकडे लक्ष जाईल.

**मुंबई–गोवा महामार्गाच्या मुद्यावर मनसे आक्रमक** : मुंबई–गोवा महामार्गप्रश्नी आता मनसे आक्रमक झाली आहे. गणपतीत कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी आता मनसे मैदानात उतरली आहे. या मेळाव्यात प्रलंबित मुंबई–गोवा महामार्गा संदर्भात आंदोलनाची हाक देण्यात आली. असे आंदोलन करा की, यापुढे रस्ते करताना सरकारला अशाप्रकारे आंदोलन झाले होते अशी भीती असावी, दहशत असावी, असे म्हणत राज ठाकरे यांनी या आंदोलनाला हिरवा कंदिल दाखवला.



# वाहनाच्या धडकेने बिबट्याचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली:** अज्ञात वाहनाने धडक दिल्याने बुधवारी पहाटे एका बिबट्याचा मृत्यू झाला. वाळवा तालुक्यातील चिकुर्डे ते ऐतवडे बुद्रुक मार्गावरील देवर्डी गावच्या हद्दीमध्ये ही घटना घडली. मृत बिबट्या नर जातीचा असून त्याचे वय तीन वर्षाचे आहे. आज पहाटे अज्ञात वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी अवस्थेत बिबट्या रस्त्याकडेला पडला होता. याची माहिती स्थानिकांनी वन विभागाला तात्काळ दिली. मात्र, वन कर्मचारी येईपर्यंत बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. बिबट्याचा अपघाती मृत्यू झाल्याची माहिती मिळताच बघ्याची घटनास्थळी गर्दी झाली होती. ऐतवडे, कुरळप, परिसरात उस शेती मोठ्या प्रमाणात असून उसाच्या फडालाच बिबट्याने आपले आश्रय स्थान केले आहे. बिबट्याचा वन विभागाने तातडीने बंदोबस्त करावा असा ठराव ग्रामसभेत केला आहे.

# भाजपाला सत्तेतून उखडून टाकणे हाच काँग्रेसचा प्लॅन


## नाना पटोले : मुंबईतील 'इंडिया' आघाडीची बैठक देशाला दिशा देणारी ठरेल

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : काँग्रेस कोअर कमिमीच्या बैठकीत मुंबईत ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर रोजी होणाऱ्या बैठकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांचे दोन प्रतिनिधीही उपस्थित होते. मुंबईत होणाऱ्या बैठकीचा आढावा घेण्यात आला आहे. या महत्वपूर्ण बैठकीतून देशात एक संदेश गेला पाहिजे त्याच्या तयारीवर चर्चा करण्यात आली. मुंबईतील 'इंडिया' आघाडीची बैठक देशाला दिशा देणारी ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला. एमसीए क्लब येथे काँग्रेसच्या कोअर कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, तेलंगणाचे प्रभारी माणिकराव ठाकरे, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष, माजी मंत्री नसीम खान, बस्वराज पाटील, आमदार कुणाल पाटील, माजी खासदार मिलिंद देवरा, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार, प्रमोद मोरे आदी नेते उपस्थित. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात ३ सप्टेंबरपासून पदयात्रा सुरु होत असून या पदयात्रेची रुपरेषा ठरवण्यात आली आहे. ४८ लोकसभा मतदारसंघातील निरिक्षकांच्या अहवालावरही या बैठकीत चर्चा करण्यात आली. केंद्रात व राज्यातील भाजपा सत्तेला उखडून टाकून काँग्रेसची सत्ता आणणे हाच आमचा प्लॅन आहे. महाराष्ट्र हे काँग्रेस विचारांचे राज्य आहे. काँग्रेस व मित्र पक्ष एकत्र लोकसभा निवडणुका लढल्या तर ४०-४५ जागा जिंकू शकू असे चित्र राज्यात आहे. त्यासाठी काँग्रेसची तयारी करत आहे. आमचे टार्गेट भारतीय जनता पक्ष आहे, जे पक्ष सोबत येतील त्यांच्यासह लढण्याची काँग्रेसची भूमिका आहे. शेतकरी, तरुणांच्या आत्महत्या वाढत आहेत, बेरोजगारी वाढली आहे, नोकऱ्या नाहीत, व्यवसाय चालत नाहीत यातून पुण्यात २१८ तरुणांनी आमहत्या केल्या आहेत. राज्यातील इतर भागातही हीच परिस्थिती आहे पण लोकं मेली तरी चालतील पण सत्ता कायम राहली पाहिजे ही सत्तेला चिकटून बसण्याची भाजपाची प्रवृत्ती आहे.अजित पवार व शरद पवार भेटीवर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, काँग्रेसमध्ये शरद पवारांबद्दल संभ्रम नाही तर जनतेत संभ्रम आहे. शरद पवार हे मोठे नेते आहेत, निर्णय घेण्यास ते सक्षम आहेत आणि त्यांनी या भेटीवर त्यांची भूमिका स्पष्ट केलेली आहे. इंडिया आघाडी सोबतच राहणार असल्याचे शरद पवारांनी स्पष्ट केले आहे. या सर्व परिस्थितीवर काँग्रेसचे वरिष्ठ नेते लक्ष ठेवून आहेत, मुंबईतील इंडिया बैठकीच्या वेळी ते शरद पवार यांच्याशी चर्चा करतील.



**पंतप्रधानांनी जनतेच्या जखमेवर मीठ चोळले** : स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून जनतेला संबोधित करताना, महागाई परदेशातील परिस्थितीमुळे वाढली आम्ही वाढवली नाही असे खोटं सांगितले. मोदी सरकार देशातील आर्थिक स्थिती हाताळू शकले नाही म्हणूनच महागाई वाढली, रुपया डॉलरच्या तुलनेत घसरत आहे तरिही महागाईचे खापर मात्र परदेशावर फोडून मोदींनी हात वर केले. मोदी सरकारने जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. या सरकारच्या काळात महिला अत्याचारही वाढले, सरकार सर्व आघाड्यावर अपयशी ठरले आहे. मोदी सरकारविरोधात जनतेत तीव्र संताप आहे पण मोदी मात्र पुन्हा येणार अशी घोषणा करतात, लोकशाहीत असा अहंकार चालत नाही, असेही पटोले म्हणाले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आमच्या शाळेच्या नियतकालिकात ही माहिती घ्या म्हणून मी आमच्या बाईंना विनंती करेन. ' पिंकी म्हणाली. ' अरे वा, छानच ! बाळांनो, एक महत्वाची गोष्ट तर आईकडून सांगायची राहिलीच. हे बारा बलुतेदार आहेत ना, वर्षभर शेतकऱ्यांच्या गरजा भागवायचे. मग शेतकरी त्यांना हंगाम म्हणजेच त्यांच्या शेतात पीक आलं की प्रत्येकाचा वाटा द्यायचे. अशा रीतीने सगळेच घटक एकमेकांवर अवलंबून असायचे. ' एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ ' ही उक्ती त्यांनी खरोखर आचरणात आणली होती बरं का ! ' आणि बरं का प्रत्येक समाजात अतिशय चांगली माणसे होऊन गेली. संत होऊन गेले. त्यांनी लोकांना सदाचरणाचा, भक्तिमार्गाचा उपदेश केला. ' बाबा म्हणाले.


' हो बाबा, बरोबर आहे. माळी समाजात श्री संत सावता माळी, तेली समाजात संत जगनाडे महाराज, शिंपी समाजात संत नामदेव, चर्मकार म्हणजे चांभार समाजात संत रोहिदास, कुंभार समाजात संत गोरा कुंभार, धोबी समाजात संत गाडगे बाबा असे अनेक संत प्रत्येक समाजात होऊन गेले. बरोबर आहे ना बाबा ? पिंकी म्हणाली. ' हो अगदी बरोबर सांगितलंस पिंकी. या संतांनी भक्तिमार्गाबरोबरच मानवतेची सुद्धा शिकवण लोकांना दिली. परमेश्वराची भक्ती आपलं काम करता करता सुद्धा करता येते याचा आदर्श स्वतःच्या उदाहरणाने लोकांना घालून दिला. ' बाबा म्हणाले. ' अजून एक नवीन माहिती सांगतो तुम्हाला. तुम्ही फड पद्धतीबद्दल कधी ऐकलं आहे का ?' ' फड पद्धत ? आम्ही तर पहिल्यांदाच ऐकतो आहोत. ' पिंकी म्हणाली. ' श्यामल, तुला माहिती आहे का याबद्दल ?' श्यामरावांनी विचारले. ' अहो, आता तुम्ही सुरुवात केली आहे, तर तुम्हीच सांगा की मुलांना. मला पण याबद्दल फारशी माहिती नाही. ' श्यामलाताई म्हणाल्या.

' ठीक आहे. थोडक्यात सांगतो. ही फार जुनी पद्धत आहे. मौर्य काळापासूनची किंवा त्याही पूर्वीची. अहिल्या होळकरांच्या काळातही ही पद्धत वापरली जात होती. आपल्या महाराष्ट्रात तर फार फार पूर्वीपासून होती. पण आता लोकांना त्याबद्दल फारशी माहिती नाही. '

' या पद्धतीत नदीला वळण बंधारा घालून पाणी शेतीकडे वळवलं जाई. छोटे छोटे बंधारे असत. प्रत्येक जण आपल्या हद्दीतून जाणाऱ्या बंधाऱ्याची देखभाल करीत असे. जमिनीचे विभाग केले जायचे. त्यांना फड म्हणत. गावातील सगळे शेतकरी एकत्र यायचे आणि कोणत्या जमिनीच्या तुकड्यावर कोणते पीक घ्यायचे हे ठरवायचे.



## समृद्ध प्राचीन वारसा



## आनंदी पहाट

## मौखिक व अमौखिक संवाद महत्त्वाचेच

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण आपल्या विवेकी बुद्धीच्या जोरावर त्या-त्या प्रसंगाचं मूल्यमापन करत असतो, त्या अनुषंगानं आपण संबंधित निर्णय घेत असतो. यामध्ये आपण स्वतःशीच संवाद साधत असतो, स्वतःलाच प्रश्न विचारतो, त्याची स्वतःच उत्तरं देतो. यांत संप्रेषकाची आणि श्रोत्याची अशा दोन्हीही भूमिका आपण एकटेच बजावत असतो. हा संवाद व्यक्तिगत, थेट आणि निकटता निर्माण करणारा असतो, ज्यात शब्द, देहबोली यांचा अंतर्भाव नसतो. आपल्या वक्तृत्वामुळे व्यक्तीचं मन वळवणे, एखाद्यावर प्रभाव निर्माण करणे शक्य होतं. ह्या वक्तृत्वामध्ये मौखिक आणि अमौखिक संवाद शक्य असतो. त्याचबरोबर अशा संवादात तात्काळ प्रतिसादही मिळत जातो. ह्या संवादाच्या, वक्तृत्वाच्या माध्यमातून नेतृत्वाचे गुण प्राप्त होऊ लागतात. वक्तृत्व चांगलं असलं तर नेतृत्व कौशल्य देखील प्राप्त होऊ शकतं, ते अधिक महत्वाचं असतं. आपल्याला प्रभावी वक्तृत्वाची गरज खरंच असते. ती प्रत्येकवेळी महत्वाची भूमिका बजावत असते. खरं तर संवादाच्या माध्यमातून साधलेलं वक्तृत्व आपल्या सजगतेचं, सतर्कतेचं एक महत्वाचं लक्षण मानलं जातं. आपल्या अंतर्मनांत येणाऱ्या विचारांना आपण वेळोवेळी मोकळी वाट करून द्यायची असते, विचारांची देवाणघेवाण करायची असते. आपल्या भावनांना वाट मिळाली कि एक प्रकारे अंतर्मनांत आनंद प्रसूत व्हायला लागतो. ह्याच कारणास्तव आपल्याला संवादाच्या माध्यमातून वक्तृत्वाची गरज असते. शरीरानं एकटी असणारी व्यक्ती जेव्हा मानसिक पातळीवर देखील एकलेपण अनुभवायला लागते, तेव्हा कोणा-ना-कोणाशीतरी संवाद साधण्याचा विचार करतेच. आपल्या मनांतील विचार, आलेले अनुभव, नवीन योजना, भोगलेला त्रास आणि दुःख तसंच आनंद शेअर केल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. सोशल मीडियाद्वारे का होईना, पण हे स्वतःला शक्य होईल त्या प्रकारे व्यक्त केलं जाऊ लागतं.



आधुनिक केसरी

**शांतीचा विसावा | हरिनामी ||**
मनोमनी करा | हाचि रे निर्धार ||
आपुला आधार | आपणचि ||१||
ध्यानी मनी स्थिर | स्वावलंबी बाणा ||
ईश्वरी साधना | साथ देते ||२||
बोलाच्या कढीला | आणु नये ऊत ||
होईल रे घात | जाण मुढा ||३||
माता पिता गुरू | सौख्याचा आधार ||
देतील आकार | जीवनाला ||४||
आता एक ध्यानी | ठेव माझ्या जीवा ||
शांतीचा विसावा | हरिनामी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

सर्वदुःखान्तकं नाम यत्तेऽस्तु मन्मुखे सदा|
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
६७||
सर्व दुःखांचा अंत करणारे असे जे तुझे नाम, ते माझ्या मुखात सदैव असावे. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

गो मन तन से भक्ति नहिं, यह सब जग कर कर्म । कर्म पाश जीव पाशिया, जन्म मरण दुख धर्म ।।१५।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल तृतीय अध्याय) ०४/०३/१५ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : शरीर, मन तसेच इंद्रियांनी भक्ती होत नाही; यांच्या द्वारे प्राकृत जगतातील कर्म होतात. ज्या द्वारे जीव कर्म बंधनात अडकतो आणि जन्म-मरणाच्या दुःखाला प्राप्त करतो. शरीर, मन आणि इंद्रियांच्या द्वारे कर्म होतात, भक्ती नाही. शुद्ध, चेतन आत्म्या द्वारे भक्ती होते. आत्माच भक्ती करतो, अंतःकरण किंवा शरीर नव्हे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ४०वे

कुलकर्णीपणाच्या दप्तराच्या व्यापाला
महाराज कंटाळुनी गेले, एक दिवस
दप्तर ते दुसऱ्यावर सोपवून दिले
पुन्हा ते गोंदवल्याच्या बाहेर पडले ।।१ ।।
नाशिक, इंदूर, काशी, अयोध्या क्षेत्रासी
राहिले, फिरले, श्रीमहाराज नंतरी
नैमिष्यारण्यात काही दिवस राहिले
आपल्या गोंदवले गावाला परतले ।।२ ।।
एके वर्षी गोंदवल्यास दुष्काळ आला
सर्वत्र एकच हाहाःकार उडाला
संकटावर महाराजांनी उपाय योजला
शेतामध्ये लोकांना रोजगार दिला ।।३ ।।
भुकेल्याच्या अन्नासाठी महाराजांनी
स्वतः प्रयत्नांची पराकाष्ठा हो केली
हजारो माणसांच्या पोटा भाकरी दिली
गावच्या लोकांनी या कामी मदत केली ।।४ ।।
भुकेल्या लोकांना अन्न दिले, काम दिले
समाधानाने महाराजांचे डोळे भरले
नाव औंध राजांच्या कानावर पडले
गोंदवल्यास येऊन ते समक्ष भेटले ।५ ।।
कवी अरुणदास धन्यता मानतो
लेखन क्रमशः श्रीचरणी ठेवितो..




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## नाम हे परमात्मस्वरूप आहे

आधुनिक केसरी

नाम म्हणजे भगवंताचे नांव. साधन या दृष्टीने देवाच्या निरनिराळया नांवांत फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे तर शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की भगवंत मुळात जो निर्गुण निराकार आहे तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नामरूप लागले आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण आणि निर्गुण भक्तीला आधार नामाचाच आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवऱ्याशी एकरूप होऊन जाते त्याप्रमाणे वृत्तिचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप बनली पाहिजे. नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे आणि वृत्तिसुध्दा सूक्ष्म आहे म्हणून नाम घेण्याने वृत्ती सुधारेल, वृत्ती सुधारली की चित्त शांत होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळयांचा भावार्थ एकच आहे.



अन्नाला स्वतःची चव असते त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वतःची अशी चव नाही. त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यात घालू तितके ते अधिक गोड वाटेल. पंढरपूरला जायला पुष्कळ रस्ते आहेत परंतु सर्वांना शेवटी बारीतून जाऊनच दर्शन घ्यावे लागते त्याप्रमाणे इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे आणि ते घेता घेता शेवटी स्वतःला विसरून जावे हाच नामसाधनेतला आनंदाचा मार्ग आहे.

जसे आपले आपलेपण आपल्या नांवात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. आपण आज जे नाम घेतो तेच नाम शेवटपर्यंत कायम राहते परंतु देहबुध्दी जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिकाधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते आणि शेवटी नाम हे परमात्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे की प्राणाबरोबर ते बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

म्हणजे गुरूला गौणपणा दिल्यासारखे झाले ! वास्तविक पाहता गुरू हा सर्वज्ञ आहे आणि तोच प्रत्यक्ष परमात्मा आहे, ही भावना दृढ झाली पाहिजे. ती तशी झाली म्हणजे त्याच्या वचनावर विश्वास बसतो, आणि गुरू सांगेल तेच साधन खरे वाटू लागते . गुरू तरी नाम हेच सत्य असे सांगतो, आणि नामस्मरणाला आणखी दुसऱ्या काही साधनांची गरज लागत नसते हे पटवून देतो . नाम हेच साधन आणि, होय तेच साध्य आहे हे अक्षरशः खरे आहे .गुरूने सांगितलेले साधन आपण पतिव्रते सारखे निष्ठेने जपले पाहिजे ती जशी आपल्या पतीशिवाय जगात दुसरा पुरुषच नाही असे मानते, त्याप्रमाणे आपण आपले साधन सांभाळले पाहिजे. जो असा अनन्यतेने वागतो, त्यानेच गुरुआज्ञा प्रमाण मानली असे होते, आणि त्यामुळेच त्याला खरे सुख होते. गुरुआज्ञेप्रमाणे वागणाऱ्याला कधीही नड येत नाही. राजाच्या राणीला दुपारी जेवायला कसे मिळेल याची काळजी नसते. तसे, गुरूचा आधार आपल्याला आहे असे ठाम समजणाऱ्याला कसली नड असणार ?

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी


अनुकूले विधी देयं यतः पूरपिता हरिः ।प्रतिकृले विधी देयं यतः सर्व हरिष्यति ॥ अन्वय- विधी अनुकूले (सति) देयम्, यतः हरिः पूरयिता ।प्रतिकूले विधी (अपि) देयम्, गतः सर्वम् हरिष्यति ।सरलार्थ देव अनुकूल असेल तेव्हा सतत देत राहावे. कारण जे कमी होईल ते भगवान श्रीहरी भरून काढील. (तसेच) देव प्रतिकूल असताही देतच राहावे. (कारण) नाहीतरी सगळे जायचेच असते. स्पष्टीकरण - दानाचे पुण्य फार मोठे. म्हणून दानाचा हात कुठल्याही परिस्थितीत आखडता घेऊ नये. कारण दानामुळे गरीब-दुबल्यांचे संसार चालायला मदत होते आणि आपण प्रतिकूल देवावरही मात केली, हे समाधान आपल्याला मिळवता येते.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १७ ऑगस्ट २०२३


लोककवी वामनदादा कर्डक पान ६





बीड जिल्ह्यात शिल्लक पाऊस पडणार का ? पान ७


# इथे बालविवाहाचे प्रमाण अधिक; मूलभूत मानवी हक्काचे होतेय हनन

## कोलाम गुड्ड्यांच्या मागासलेपणाला कोण जबाबदार ?

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर :** जागृत संस्थेच्या माध्यमातून आठवले समाजकार्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनाने महाराष्ट्रातील मागासलेपणा चव्हाट्यावर आणून ठेवला आहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या गप्पा करणाऱ्या लोकप्रतिनिधींना मुंबई, पुणे, नागपूर येथील विकासच महाराष्ट्राचा खरा विकास वाटतोय काय ? असा जळजळीत प्रश्न मेंदूत निर्माण व्हावा इतकी विदारक स्थिती चंद्रपूर जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या कोलाम गुड्यांची आहे. मुलभूत मानवी हक्काचे इथे हनन होतेय. विद्यार्थ्यांनी केलेले हे संशोधन सरकारच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे.

चिमूर समाजकार्य महाविद्यालयातील अंतिम वर्षात शिकत असलेल्या विध्यार्थीनी जागृत संस्थेच्या माध्यमातून अहवाल सादर केला आहे. या अहवालात सोळा आदिम कोलाम गुड्यांची सद्यस्थिती मांडल्या गेली. यात ७७ टक्के नागरिकांना आपले लोकप्रतिनिधी जसे सरपंच, सभापती, आमदार, खासदार कोण ? याची साधी माहीती नसल्याचे पुढे आले आहे.१४ टक्के कोलांमाकडे शेती नाही. उर्वरीत शेती पट्ट्याची व अतिक्रमीत आहे. १८ वर्षाखालील ६८.९७ टक्के मुलीचे विवाह होतात. तर युवकांच्या बालविवाहाचे प्रमाण ६१ टक्के आहे. ३५.३३ टक्के कुटुंबाकडे घरकूल नाही.  ज्यांच्याकडे घरकूल आहे त्यास शौचालय नाही व बांधकाम अपुर्ण आहे. ४६ टक्के नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाच उपलब्ध नाही. १२ टक्के गावात अंगणवाडीची सोय नाही. ब-याच गावात आठवड्यातून एक-दोनदा अंगणवाडी उघडते. २६ टक्के कोलाम गुड्यावर शाळाच नाही. आरोग्य सुविधा नसल्याने १७.३४ टक्के कोलाम वनोषधीचा वापर करतात. ६० टक्के गावात दळणवळणाची सुविधा उपलब्ध नसल्याने पायदळ प्रवास करावा लागतो. २८.२७ टक्के कोलांमाचे उत्पन्न केवळ २ ते ५ हजार आहे. ४३.४० टक्के नागरिक अशिक्षित आहेत. ८५ टक्के



कोलांमाकडे जातीचे प्रमाणपत्र नाही. १५.८७ टक्के नागरिकांकडे अजूनही मतदान कार्ड नाही. ९२.३२ टक्के महिला व मुली मासिक पाळीत पॅड वापरत नाही. ७० टक्के कुटुंबाकडे शौचालय नाही. ६.२० टक्के मातामृत्यू-बालमृत्यूचे प्रमाण आहे. अशी धक्कादायक माहीती सर्वेक्षणातून पुढे आली आहे.

**विकासाचा मागमूस नसलेली ही आहेत गावे :** चंद्रपूर जिल्हात येणाऱ्या माणिकगड पहाडातील जिवती तालुक्यातील रायपूर, खडकी, कलीगुडा, मारोतीगुडा, काकबन, लेंडीगुडा, भुरीयेसापूर, टाटाकोहाड, लांबोरी, पल्लेझरी, आंबेझरी, सीतागुडा, लचमागुडा, जनकापूर, बेलगाम, घोडणकप्पी या १६ गावांची निवड केल्या गेली . प्रत्यक्ष कोलाम समुदायांसोबत महिनाभर राहून त्यांच्याशी संवाद साधत माहिती जाणून घेतली . विविध प्रश्नांचा अभ्यास व निष्कर्षासाठी गावातील प्रत्येकी १० कुटुंबांचे सर्वेक्षण केले . आदिवासी विकास योजनाचा आदिम कोलामांवर काय साधक-बाधक परिणाम झाला . शासकीय योजनेतील अंमलबजावणीच्या उणिवा कोणत्या याबाबतही त्यांनी सर्वेक्षण अहवालात नोंदविले आहे .

**इंडिया नव्हे हा खरा भारत :** स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही आदिम कोलाम समुदाय मुलभूत हक्कापासून वंचित असणे धक्कादायक आहे . या अहवालाकडे शासनाने लक्ष द्यावे . आदिम कोलामांच्या प्रश्नांवर, हक्क, संस्कृतीवर संस्थेच्या माध्यमातून व्यापक जनजागृती व कृतियुक्त रचनात्मक काम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत . हा वास्तवदर्शी अहवाल शासन-प्रशासनाकडे सादर करण्यात येईल . यातून धोरणात्मक निर्णय घेण्यास शासनालाही मदत होणार आहे, असे अविनाश पोईनकर
अध्यक्ष, जागृत संस्था चंद्रपूर यांनी सांगितले .



## अजित दादा पवार उर्दू हायस्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मोहम्मदिया उर्दू प्राथमिक शाळा, अजित दादा पवार उर्दु हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी उदयोजक मनोज पवार, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अहेमद अली भैया, एकलव्य संघटनेचे पवन सोनवणे , माजी उपनगर अध्यक्ष अब्दुल जावेद यांची प्रमुख उपस्थीत होती. उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सन्मान पत्र व स्मृती चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या वेळी योगेश पवार, मनोज देशमुख, सोमनाथ दाभाडे, संदिप नरवडे, पवन ठाकुर, रुपेश भारूका, सोपान शिरसाठ, योगेश त्रिभवन, संदेश पवार, शंकर राऊत, बंटी जाधव तसेच शिक्षक वृंद, कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थीती होती.

## स्वयंघोषित राष्ट्रसंत लोमटे गजाआड

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** दैवी चमत्काराचे दावे करणाऱ्या स्वंयघोषित राष्ट्रसंत लोमटे महाराजाला महिलेवर केलेल्या अत्याचार प्रकरणी येरमाळा पोलिसांनी अटक केली आहे. पंढरपूर येथे सापळा लावून मोठ्या शिताफीने पोलिसांनी लोमटे महाराजाला गजाआड केले आहे. न्यायालयाच्या आदेशावरून पोलिसांनी ही कारवाई केली आहे. दर्शनासाठी आलेल्या महिलेस खोलीमध्ये बोलावून किळसवाणे कृत्य करून मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी लोमटे महाराजावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिसांनी सापळा रचून लोमटे महाराजाला पंढरपूरमधून अटक केली आहे. दैवी चमत्कारामुळे राज्यभर प्रसिद्ध असणारा कळंब तालुक्यातील मलकापूर येथील एकनाथ लोमटे विरोधात २८ जुलै २०२२ रोजी पीडित भक्त महिलेने दिलेल्या तक्रारीवरून येरमाळा पोलिसात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. परळी येथील ३५ वर्षीय पीडित महिला मलकापूर येथील स्वयंघोषित राष्ट्रसंत लोमटे महाराज यांच्या दर्शनासाठी मठातील दक्षिण मंडपात गेली होती. महाराजाने महिलेस खोलीमध्ये बोलून घेत महिलेचा विनयभंग केला होता.







# पवारांचा मोदींना टोला

आधुनिक केसरी

मी पुन्हा येईन... असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून व्यक्त केला होता. यावरुन आता शरद पवारांनी टीकास्त्र सोडलेय. ते औरंगाबादमध्ये बोलत होते. यावेळी शरद पवारांनी सत्ताधाऱ्यांवर टीकास्त्र सोडले तर मुंबईमध्ये होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीबाबतही माहिती दिली. मोदींवर टीका करताना शरद पवार म्हणाले की, 'देशाचे चित्र मोदी सरकारला अनुकूल दिसत नाही, त्यामुळे मी पुन्हा येईल असे कितीही सांगितले तरी त्यांची अवस्था देवेंद्र फडणवीस यांच्यासारखी होईल. मणिपूरजवळ चीन आहे, त्यामुळं अधिक काळजी घेण्याची गरज आहे. घडणाऱ्या सर्व गोष्टी देशाच्या दृष्टीने घातक आहेत, 90 दिवसांपासून संघर्ष सुरु आहे. अविश्वास ठरावाच्या दिवशी मणिपूरवर 2 मिनिटे बोलले आणि इतर विषयावर 2 तास बोलले. प्रधानमंत्र्यांनी मणिपूर0मध्ये जावे लोकांना विश्वास द्यावा, हे त्यांना महत्वाचे वाटलं नाही. त्यापेक्षा निवडणुकांच्या तयारीची मीटिंग घेणं त्यांना महत्वाची वाटली. मणिपूरमध्येस्त्रियांची धिंड काढली जाते आणि मोदी सरकार पाहतेय, म्हणून जनमत मोदी सरकार विरोधात करायची इंडियाची भूमिका आहे. दिल्ली भाषणात त्यांनी या सगळ्यांचा उल्लेख करण्याऐवजी देवेंद्र फडणवीस यांचे मार्गदर्शन घेऊन मी पुन्हा येईल म्हणाले. आता फडणवीस आले मात्र कसे ? ते बघितले त्यामुळं आता हे पुन्हा कसे येतील बघावे लागेल. असो, आम्ही संघर्ष करू आणि माजबुतीने उभे राहू. जनमत तयार करून यांना धडा शिकवू, असे म्हणत शरद पवारांनी मोदींवर टीकास्त्र सोडले. गेल्या काही दिवसांपासून मी राज्यात फिरतोय. लोक समर्थन करत आहेत, पाठिंबा देत आहेत. सांगोल्यात हजारो लोकांनी माझी गाडी अडवली, अनेक ठिकाणी लोक पुढं येत आहेत. समर्थन करत आहेत, आनंद आहे.. बीड सभेनंतर काही दिवसांनंतर पुन्हा बाहेर पडणार आहे, असे पवार म्हणाले. देशाची सत्ता ज्यांच्या हातात आहे, त्या भाजप आणि सहकाऱ्यांनी यांची भूमिका समाजातून एकवाक्यता संपवण्याची आहे. धर्म समाजामध्ये विभाजन कसे होईल, कटुता कशी वाढेल ? याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यासाठी आम्ही देशपातळीवर 2 सभा घेतल्या. 6 राज्याचे मुख्यमंत्री त्यात होते, या व्यासपीठाला आम्ही इंडिया नाव दिले. याच इंडियाची बैठक मुंबईत आहे. मोदी सरकार विरोधात जनमत दाखवणे आणि पर्याय देणे यासाठी हा लढा आहे. समाजात जातीय उन्माद मोदी सरकार वाढवतेय. घेतलेले निर्णयामुळे कटुता वाढत चालली आहे. उदाहरण द्यायचे झाले तर इंग्लिश माध्यमांच्या शाळेत सीबीएसई शाळा कशा चालवायचा? हे केंद्र सरकर ठरवते. नव्या नियमांनुसार 14 ऑगस्ट 2023 हा दिवस फाळणी दिवस साजरा करावा असे सांगितले. यावेळी प्रचंड वेदनादायी गोष्टी झाल्या होत्या, कटुता निर्माण झाली होती. मात्र आता हा राग कटुता कमी होत असताना यांनी पुन्हा ते वर काढले आणि फाळणी दिवस साजरा करायला लावला. 2 समाजात कटुता येईल असे प्रदर्शन ठिकठिकाणी भरावे असे आदेश देण्यात आले आहेत. याबाबत निषेध करण्याची भूमिका इंडिया घेणार आहे, असे पवार म्हणाले.

# महागाई सर्वसामान्यांची गंभीर समस्या



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महागाईसामान्य माणसाच्या जीवनाशी निगडीत एक गंभीर समस्या आहे जी संपूर्ण आर्थिक रचनेवर परिणाम करते. देशात महागाई सातत्याने वाढत आहे. दरम्यान, महागाई नियंत्रणात आणण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. त्याचवेळी, स्वातंत्र्य दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही महागाईच्या मुद्द्यावर भाष्य केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून सांगितले की, त्यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'सर्वोत्तम प्रयत्न' केले आणि जनतेवरील हा भार कमी करण्यासाठी आगामी काळातही प्रयत्न सुरूच राहतील. स्वातंत्र्य दिनानिमित्त देशाला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज संपूर्ण जग महागाईच्या संकटाचा सामना करत आहे आणि महागाईने संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला ग्रासले आहे.**

पंतप्रधान म्हणाले, "कोविड महामारीच्या उद्रेकातून जग अजूनही पूर्णपणे सावरलेले नाही. युद्धामुळे आणखी एक समस्या निर्माण झाली आहे. जग महागाईच्या समस्येने ग्रासले आहे. महागाईने जागतिक अर्थव्यवस्थेला वेठीस धरले आहे. महागाई वर सरकार बोलत आहे.मात्र सरकारला देखील महागाई कमी करता आली नाही.उलट दिवसेंदिवस महागाई वाढत आहे.

गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या महागाईचे मुख्य कारण म्हणजे पुरवठ्याची कमतरता आणि लोकांची कमी क्रयशक्ती. रिझर्व्ह बँकेने आपल्या पतधोरणांतर्गत वेळोवेळी व्याजदरात बदल करून महागाई रोखण्याचा प्रयत्न केला आहे. पण अनेक कारणांमुळे भाव वाढत गेले. तेलाच्या किमतीतील वाढ रोखणे हे कोणत्याही देशाच्या अखत्यारीत नाही कारण ते थेट तेल निर्यात करणाऱ्या देशांशी संबंधित आहे. रशिया आणि युक्रेनमधील युद्धाचा परिणाम तेलाच्या पुरवठ्यावर झाला असून किमती वाढल्या आहेत. त्याचप्रमाणे गॅस सिलिंडरच्या किमतीतही सातत्याने वाढ होत असून याचा फटका प्रत्येक गृहिणीला बसला आहे. कोरोनाच्या काळात देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे ठप्प झाली होती आणि त्यातून सावरायला वेळ लागणे स्वाभाविक आहे. तेलाच्या किमती वाढल्याने वाहतुकीवर खोलवर परिणाम होतो, त्याचा थेट परिणाम सर्वसामान्यांवर होतो. वाढत्या लोकसंख्येचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही वाईट परिणाम होतो. या संकटावर तोडगा काढणे सरकारला अद्याप शक्य झालेले नाही हे खरे असले तरी देशातील महागाई वाढण्यामागे ही समस्या नेहमीच एक प्रमुख कारण आहे.

काळाबाजार हे देखील महागाई वाढण्यामागचे एक प्रमुख कारण आहे, जे रोखण्यात सत्ताधारी सरकार अपयशी ठरले आहे. सत्तेच्या वेळी, सत्तेत असलेले लोक सहसा डोळ्यांवर पट्टी बांधून काम करतात, नंतर आपल्या प्रियजनांना रवि वाटून घेतात. असे लाडके लोक सरकारी मालमत्तेचे शोषण करून आपले खिसे भरत राहतात, मग ती रेती असो, खडी असो, सरकारी इमारती-रस्त्यांचे बांधकाम असो, जे शेवटी एक ना एक प्रकारे महागाई वाढवण्यास हातभार लावतात.

आजकाल छोट्या-छोट्या कामांचेही उद्घाटन करून त्यावर नावाचे फलक लावण्याची स्पर्धा लागली आहे. प्रत्येक पक्षाच्या सदस्यांना असे फलक लावून प्रसिद्धी मिळवायची असते आणि उदघाटन समारंभात कंत्राटदारांना चहा वगैरेचा बोजा उचलायला लावतात आणि त्या बदल्यात असे लोक कामाच्या दर्जाशी तडजोड करून सरकारला गरिबांवर कर लादण्यास भाग पाडतात. करा.



उदाहरणार्थ, अलीकडेच, गुजरातमधील मोरवी पूल, ज्याच्या दुरुस्तीसाठी आठ कोटी रुपये खर्च आला, तो काही दिवसांतच कोसळला, ज्यामध्ये १३० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि अशा अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना सरकारने मोठी आर्थिक मदत केली आणि जे एक ना एक प्रकारे महागाई वाढवण्याचे प्रमुख घटक बनतात. सत्तेत येण्यासाठी सर्वच पक्ष मोठमोठ्या घोषणा करतात आणि मतदारांना आकर्षित करण्यासाठी कोणत्याही प्रमाणात सरकारी पैशांची लूट करत राहतात.

उदाहरणार्थ, महिलांसाठी मोफत वीज-पाणी आणि मोफत गॅस शेगडी उपलब्ध करून देणे आणि त्यांना बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देणे, तसेच शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करणे यासारख्या योजना सरकारी तिजोरीवर मोठा बोजा बनतात आणि सरकारला पैसे द्यावे लागतात. सरकारच्या तिजोरीत हा पैसा येतो तरी कुठून .. शेवटी पैसा जनतेचाच ना. . फुकट्या घोषणापायी प्रचंड कर्जाचे बळी व्हावे लागते. . अशा भुरळ पाडणाऱ्या योजनांना आळा घातला नाही, तर एक ना एक दिवस देशात आर्थिक मंदीचा काळ येईल आणि लोक महागाईने जीवन-मरणाच्या खाईत झुलतील. राजा सैल झाला की त्याचे लेफ्टनंट आणि नोकरशहा खूप मस्ती करतात आणि सरकारी पैसा दोन्ही हातांनी लुटतात मंत्री सरकारी पैसा योजनांवर विनाकारण खर्च करत राहतात आणि कमिशनच्या स्वरूपात आपले खिसे भरत राहतात. गरज नसतानाही अनेक ठिकाणी विश्रामगृहे बनवून ती दारुड्यांचे अड्डे बनतात. याच्या नावाखाली आगामी योजनांसाठी दहा वर्षे साहित्य खरेदी करून ते रस्त्याच्या कडेला हक्काविना टाकून सरकारी पैशांची फसवणूक करत आहेत. बड्डीतील अनेक फार्मा कंपन्या निकृष्ट उत्पादनांच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या आहेत, ज्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांना कुठेतरी आश्रय देण्यात आला आहे,

कमकुवत घोडेस्वारांचा फायदा घेऊन आपले हात रंगवण्यात सरकारी नोकरशहाही मागे राहत नाहीत. चापलूस आणि भ्रष्ट अधिकारी प्रत्येकी दोन, ते तीन विभाग ठेवण्याच्या स्पर्धेत गुंतले आहेत आणि भ्रष्टाचाऱ्यांशी संगनमत करून सर्वसामान्यांना कळणार नाही अशा पद्धतीने पैसे लुटतात. सरकारी इमारती कंत्राटदार आणि त्यांच्या मर्जीतील एजन्सींच्या माध्यमातून बांधल्या जातात आणि त्यांचा फायदा करून देताना ते स्वतःचा खिसाही भरत राहतात. उदा टोल नाके.सरकारी पैशाची ही लूट महागाईचे रूप घेते आणि गरीब मध्यमवर्गीयांना त्याचा बळी व्हावा लागतो. सत्तेत असलेले लोक त्यांच्या सर्व आवश्यक आणि काही गैर-अत्यावश्यक प्रयत्नांमध्ये सरकारी पैशाचा बिनदिक्कतपणे दुरुपयोग करत असतात. त्या ठिकाणचे अधिकारी स्वतःची गाडी घेऊन मुक्कामाच्या वेळी हजेरी भरेपर्यंत मंत्री लक्ष देत नाहीत. मंत्र्यांना सरकारी कामातील बारकावे माहीत नसल्यामुळे त्यांना नोकरशहांच्या सल्ल्यावर अवलंबून राहावे लागते. नोकरशहाच त्यांना पैसा खर्च करण्याचा मार्ग दाखवतात आणि त्या बदल्यात त्यांना काही बक्षीसही मिळावे असे वाटणे स्वाभाविक आहे. सरकारचे पाठीराखे बनून तेही भ्रष्टाचार करण्यापासून मागे हटत नाहीत. कारण त्यांच्या पाठीवर मंत्र्यांचे हात आहेत हे त्यांना माहीत आहे. अशा भ्रष्ट नोकरशहांवर फक्त दक्षता विभाग कारवाई करू शकतो. परंतु त्यांच्या सापळ्यात अडकण्याची शक्ती देखील अशा प्रकारे मर्यादित आहे की ते धूर्त लोकांना जाणूनबुजून पकडू शकत नाहीत. निवडणुकीच्या काळात बुद्धीजीवी मतदार अशा भ्रष्ट राजकारण्यांच्या विरोधात आपले मत वापरतात आणि निवडणुकीच्या मैदानात त्यांचा पराभव करतात, पण हा खेळ शाश्वत असतो आणि प्रत्येक पक्षाचे लोक खेळत राहतात. मोदीजींनी या राजकीय खेळाडूंच्या कृत्यांवर मोठ्या प्रमाणात अंकुश ठेवला आहे, परंतु असे बरेच लोक आहेत जे त्यांचे पाय खेचतात आणि त्यांना कधीही खाली आणण्याचा प्रयत्न करतात. या दुष्ट लोकांच्या कारवायांवर जर बहुसंख्य जनतेची करडी नजर राहिली तर भ्रष्ट राजकारणी आणि नोकरशहांना देश लुटण्याची आणि गरीब जनतेला त्रास सहन करण्याची हिंमत आणि ताकद उरलेली नाही. पण त्याचे पाय खेचणारे अनेक लोक आहेत, जे त्यांना खाली आणण्याचा प्रयत्न करत आहेत. या दुष्ट लोकांच्या कारवायांवर जर बहुसंख्य जनतेची करडी नजर राहिली, तर भ्रष्ट राजकारणी आणि नोकरशहांना देश लुटण्याची आणि गरीब जनतेला त्रास सहन करण्याची हिंमत आणि ताकद उरणार नाही.

# सांस्कृतिक अतिक्रमणाचा वाढता प्रभाव



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सांस्कृतीक अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत चाललं आहे आणि हे अतिक्रमण रोखण्यासाठी आपण कुठेतरी कमी पडतोय.तंत्रज्ञान युगातील प्रगती अगदी कौतुकास्पद आहे. गृह तारे यांचा शोध घेणारा मानव खऱ्या अर्थाने माणुसकीचा वेध घेण्यात मात्र स्पेशल अपयशी ठरतो आहे. सध्याच युग हे विज्ञान तंत्रज्ञान युग म्हणून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. ही कौतुकास्पद अभिनंदनीय बाब आहे. अगदी प्रत्येकाला कौतुक वाटेल या वेगाने आपली प्रगती होत असताना या प्रगतीला गालबोट पण खूप वेगाने लागताना दिसत आहे.**

दिवसेंदिवस नात्यांतील विभक्ती करणं झपाट्याने वाढत आहे हे अगदी सत्य असुन सामाजिक दृष्ट्या ही अधोगती आहे.अस म्हटलं तरी अयोग्य होणार नाही. प्रत्येक व्यक्ती किंवा जीव हा स्वतंत्र अस्तित्व म्हणून जन्माला येत असतो. म्हणून नैसर्गिक दृष्ट्या कोणीही कोणावर जबरदस्ती अथावा अन्याय करू शकत नाही .जीवन जगण्याचा अधिकार हा प्रत्येकाला आहे.परंतु हे जीवन जगत असताना नैसर्गिक धर्म पालन झाले पाहिजे. नैसर्गिक धर्मात कुटुंब हि संकल्पना समाविष्ट होते. कुटुंब या संज्ञेला शक्य तेवढा तडा न जाऊ देता प्रत्येकाने आपल्या स्वतंत्रयाचा योग्य वापर करून जीवन व्यतित केले पाहिजे. जेणेकरून आपल्याकडून इतरांना त्रास होणार नाही. तसेच आपल्या अधिकारावर अतिक्रमण हि होणार नाही याची परिपुर्ण दक्षाता घेतली गेली तर नात्यांतील विभक्ती करणं न होता प्रत्येकाला आप आपल्या विवेकानुसार जीवन जगण्यात अडचण निर्माण होणार नाही व कुटुंब ही संकल्पना मजबुत होईल.कुटुंब हि संकल्पना तशी विस्तृत असते. अगदी पंचवीस तीस वर्षे अगोदरच पाहिलं तर कुटुंब म्हणजे चुलते चुलती आजी आजोबा सख्खे भाऊ चुलत भाऊ असा विस्तृत दांडगा समुदाय म्हणजे कुटुंब असायचं.तरी देखील खुप आपुलकी प्रेम जिव्हाळा असायचा तो वरकरणी नाही. अंतःकरणातुन असायचा आणि तो अगदी कृतीतून दिसायचा. पण सध्या कुटुंब म्हणजे फक्त पती पत्नी आणि मुलं इथपर्यंत आलंय अलिकडच्या काळात तर आई वडील पण या संकल्पनेतून बाहेर पडले. फक्त पती पत्नी म्हणजे कुटुंब झालं आणि खरी गंमत इथंच आहे .पती पत्नी एवढं लहान कुटुंब होऊन सुद्धा यांच्या मध्ये वारंवार वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने मतभेद निर्माण होत आहेत. आणि याचा शेवट विभक्ती करणात होत आहे. मग नेमकं हे सगळं काय चाललंय आणि हे कुठपर्यंत जाऊन थांबणार आहे आणि मग सगळ्याला नेमकं जबाबदार कोण आहे. सध्याच्या युगातील होणाऱ्या घडामोडी वर चिंतन मंथन करण क्रमप्राप्त आहे.सगळ्यात विचित्र बाब तर ही आहे कि ती म्हणजे पती, पत्नी आई-वडील यांच्या पासुन मुलं तसेच अनेक जीवाला जीव देणारे मित्र हे सगळे कसे क्षणार्धात विभक्त होत आहेत. हे सध्याच्या युगातील सगळ्यात विदारक चित्र आहे. याला कारणीभूत नेमकं कोण आहे. याचे समजिक परिणाम आणि त्यावरील उपाययोजना भविष्यातील समाज व्यवस्था टिकण्यासाठी आवश्यक आहेत. मोह,माय,लोभ वृत्ती या अवगुणांचा वाढता प्रभाव तसेच, भौतिक संसाधन यांचं वाढत महत्व दिवसेंदिवस ढळत चालेली नितिमता ,संयमाचा अभाव, अफाट वेगाने, वाढत असलेला अंहकार आणि दुर्बल होत चाललेले धर्म संस्कार दुरदृष्टी चा अभाव या सगळ्या बाबी मुळ कोणाचेही महत्व कोणाच्या लेखी राहिलेल नाही. मी स्वतः योग्य आहे बरोबर आहे. आणि मला खूप ज्ञान आहे मी एकटाच खुप हुशार चाणक्ष आहे. या आविर्भावात होत असलेल आचरण आणि छोट्या छोट्या गोष्टी मुळे होणारे मनभेद त्यातुनच उचल जाणार टोकच पाऊल . आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे लहान होण्यासाठी किंवा दोन पावलं मागे येण्यासाठी कोणीही तयार नाही. मग मार्ग कसा निघणार आणि मग शेवटी त्याची परिणिती हि विभक्त करणात होणारच. हे वास्तविक सत्य आहे.

निसर्गाने दिलेल जीवन शांततामय मार्गाने जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. समाज व्यवस्था बंधनं ह्या बाबी पेक्षा नैसर्गिक न्याय हा खुप महत्वाचा आहे.ज्ञान वृध्दींगत होऊन प्रत्येक व्यक्तीला संयमित होण्याची आवश्यकता आहे. स्वतः हून कोणीही कोणाच्याही नैसर्गिक अधिकारांवर गदा आणता कामा नये.आणि नैसर्गिक न्याय स्वातंत्र्य वापरताना सद्सद विवेक बुद्धी जागृत असली पाहिजे. जेणेकरून आपलं स्वातंत्र्य हे इतरांना त्रासदायक होणार नाही . प्रत्येकाने आपल्या आचरणात खुप लवचिकता ही दैनंदिनी जीवनात कृतीतून दाखवली पाहिजे. स्वार्थचा लवलेशही नसला पाहिजे. कुठल्याही नातेसंबंधां मध्ये स्वार्थाने प्रवेश केला .कि नातं संपुष्टात आलं म्हणून समजा . म्हणून नातेसंबंध कोणतेही असु द्या त्यामध्ये प्रचंड विश्वास ,असला पाहिजे. परोपकार, निष्ठा , प्रमाणिकता जोपासली पाहिजे , समजुतदार वृत्ती,संयम , आवश्यक आहे आणि , अहंकार , तुलनात्मक अभ्यास, करण्याची वृत्ती,नसली पाहिजे. आपल्या सहकाऱ्याचा एखाद्या निर्णय आपल्यला आवडला नाही योग्य वाटला किंवा तो आपल्या मनाविरुद्ध आहे किंवा आपल्यावर अन्यायकारक आहे, असं आपल्याला वाटत असेल तर मग अशा वेळी आपण आपल्या ज्ञानावरून लोकशाही पद्धतीने आपलं मत त्या व्यक्तीला सांगु शकतो. त्यासाठी टोकाचा निर्णय भुमिका घेण्याची आवश्यकता अजिबात नाही. कारण जीवनात वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने अनेक असे नातेसंबंध निर्माण होत असतात. मग यापैकी किती नातेसंबंध शेवटच्या श्वासापर्यंत टिकतात तर अगदी नगण्य कारण कुठलेही नातेसंबंध हे ज्ञानावर आधारित असले पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# 'अभंग एकविशी'तून तुकाराम महाराजांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचतील

## अजित पवार : तुकाराम महाराजांच्या निवडक २१ अभंगांच्या 'अभंग एकविशी' पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जगतगुरु संत तुकाराम महाराजांनी चारशे वर्षांपूर्वी लिहिलेल्या अभंगातून २१ अभंग निवडून ते 'अभंग एकविशी' पुस्तकाच्या रूपाने प्रकाशित करण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे. 'गाथा परिवार' आणि आमदार अमोल मिटकरी यांच्या संकल्पनेतून प्रकाशित 'अभंग एकविशी- तुकोबारायांची' पुस्तकामुळे संत तुकाराम महाराजांचे सत्यशोधक विचार सर्वांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केला.

'गाथा परिवार' आणि आमदार अमोल मिटकरी यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांच्या देवगिरी निवासस्थानी झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार अमोल मिटकरी, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार नितीन पवार, आमदार डॉ. किरण लहामटे, गाथा परिवाराचे अविनाश महाराज काकडे, अशोक महाराज काळे, तुलसीदास खिरोडकर, राजु चिमणकर, नंदकिशोर चिपडे, अनंत गावंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

जगतगुरु संत तुकाराम हे काळाच्या पुढचा विचार मांडणारे सत्यशोधक विचारांचे संत होते. त्यांच्या अभंगाना व्यावहारीकतेची जोड होती. सामान्य माणसाच्या जगण्यातील विचार त्यांनी साहित्यात मांडले. महाराजांनी चारशे वर्षांपूर्वी लिहिलेले अभंग आजच्या आधुनिक युगातही तितकेच समर्पक, व्यवहार्य, मार्गदर्शक आहेत. संत तुकोबारायांचे अभंग हे मानवी जीवनावरील महाभाष्य आहेत. या महाभाष्यातील २१ अभंग निवडण्याचे आणि 'अभंग एकविशी' पुस्तिकारुपाने प्रसिद्ध करण्याचे कठीण काम अमोल मिटकरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे असेही अजित पवार म्हणाले.



'अभंग एकविशी- तुकोबारायांची' पुस्तिका प्रकाशनाच्या उपक्रम प्रत्यक्षात आणल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'गाथा परिवार' तसेच आमदार अमोल मिटकरी व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. जगतगुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंगांच्या प्रचार-प्रसारासाठी 'गाथा परिवार', आमदार अमोल मिटकरी आणि आपल्यापैकी अनेक जण करीत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या प्रयत्नांना शुभेच्छा दिल्या.

'अभंग एकविशी' पुस्तिकेच्या माध्यमातून संत तुकाराम महाराजांचे अंधश्रद्धा निर्मुलन, सर्वधर्मसमभावाचे, सत्यशोधक विचार, शेतकरी, कष्टकरी, सैनिक वर्गाला दिलेला संदेश, मानवी मूल्ये रुजवण्यासाठी महाराजांनी केलेले प्रयत्न या साऱ्या गोष्टी, शालेय विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत, समाजातल्या सर्व घटकांपर्यंत पोहोचतील, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.



# चिमुकलीचे धाडस अन् डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** वाघाच्या तावडीतून सुटलेल्या ८ वर्षीय चिमुरडीचे धाडस आणी डॉक्टरांचे शर्थीचे प्रयत्न यातून चिमुरडी सहीसलामत घरी आली असून यावर्षीचा स्वातंत्र्यदिन तिच्यासाठी नक्कीच नवीन सूर्योदय घेऊन आला आहे. दि.६ , वेळ सकाळी ७.३०, ठिकाण दापुर, ता.सिन्नर..आजोबा शेतात निघाले आणि पाठीमागूनआठ वर्षाची संस्कृती आव्हाड त्यांचा राहिलेला फोन देण्यासाठी बांधावरून पळत होती सोबत तिची छोटी बहीणही होती. तेवढ्यात मक्याच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने तिच्यावर झडप घातली. जबड्यात मान पकडुन तिला मक्याच्या दिशेने ओढण्यास सुरुवात केली. अत्यंत जबरदस्त ताकद असलेल्या जबड्यातून ती मान सोडवणे अशक्यप्राय गोष्ट आणि तेही संस्कृती सारख्या चिमुकल्या जीवाला. जिवाच्या आकांताने ती आणि तिची बहीण ओरडली. आजोबांनी मागे वळत तिच्या दिशेने झेप घेतली आणि बिबट्याने तिला सोडत धूम ठोकली. तोपर्यंत काळाचा घाला नजदीक आला होता, रक्ताच्या थारोळ्यात पडलेली संस्कृती जगण्याची केविलवाणी धडपड करत होती. मानेची रक्तवाहिनी फुटून रक्तस्राव सुरू होता. दापूरचे सामाजिक भान असलेले नवनाथ आव्हाड, सुधाकर आव्हाड यांनी अत्यंत तत्परतेने प्रथमोपचार करत तिला तात्काळ नाशिक येथील सनराईज हॉस्पिटल येथे दाखल केले. डॉ.वैभव पाटील, डॉ.मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली बालरोगतज्ञ डॉ. प्रितिश देवरे, सर्जन डॉ. कुणाल जाधव, कान नाक घसा तज्ञ डॉ. नितीन चिताळकर आणि प्लास्टिक सर्जन डॉ. निलेश पाटील ह्यांच्या चमूने तत्काळ उपचार सुरू केले. मानेवरची बिबट्याची पकड बघता श्वासनलिका, मेंदूला रक्तपुरवठा करणारी मुख्य रक्तवाहिनी आणि मानेच्या मणक्याला गंभीर दुखापत झाल्याची शक्यता होती. सिटीस्कॅन करून लगेच शस्त्रक्रिया गृहात नेत महत्वाच्या रक्तवाहिन्यांमधील रक्तस्त्राव बंद केला. दुर्दैवाने डाव्या बाजूची मेंदूला रक्तपुरवठा करणारी मुख्य रक्तवाहिनी आघातामुळे अंतर्गत रक्ताची गुठळी तयार झाल्यामुळे बंद पडली होती आणि संस्कृतीला पक्षघाताचा धोका निर्माण झाला होता. निष्णांत मेंदुरोगतज्ञ डॉ.प्र णव शिंदे आणि रक्तवाहिनी सर्जन डॉ. प्रवीण नारखेडे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील ट्रीटमेंट सुरू झाली. हळूहळू संस्कृतीच्या प्रकृतीमध्ये सुधारणा दिसू लागली आणि आठ दिवसांच्या उपचारानंतर तिच्या बंद झालेल्या रक्तवाहिनीतून रक्तपुरवठा काही अंशी का होईना सुरू झालेला दिसू लागला. संस्कृती खूप धाडशी, जिद्दी आणि सहनशील असल्यामुळे ती या संकटातून सुखरूप बाहेर आली. उपचारादरम्यान ती कुठेही घाबरलेली, भेदरलेली किंवा अस्वस्थ वाटली नाही, असे तिच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितले. दि.१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी तिला पूर्णपणे बरे वाटून ती कुटुंबात सुखरूप परतली. संस्कृतीच्या धाडशी कृतीतून स्वतंत्र भारताच्या मुली निश्चितच धाडसी आहेत, स्वतःच्या पायावर समर्थपणे उभे राहत समाजात मानाने वावरण्यासाठी सज्ज आहेत, असा समाजाला संदेश मिळाला आहे.

# महिलांचा अवमान रोखण्यासाठी शिवीमुक्तीचा संकल्प

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** राग आला की एक तर मारायला हात शिवशिवतात, नाही तर तोंडातून सात पिढ्यांचा उद्धार हमखास. पण यामागे मनातील रागाला वाट करून देण्याचा मार्ग मानला जात असला तरी यात प्रामुख्याने महिलांवरूनच उद्धाक केला जातो. या पिढीजात परंपरेचा त्याग करण्याचा निर्धार सांगलीच्या नमराह फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी केला असून याची आठवण करून देण्यासाठी सह्याद्रीनगरात शिवीमुक्त कट्टाही उभारला आहे. या परिसरात कष्टाची कामे करून आपला उदरनिर्वाह करणारा मजूर वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे.

खिशाने गरीब असलेल्या या भागातील कार्यकर्त्यांनी नमराह फाउंडेशनच्या माध्यमातून समाजसेवेचा वसा घेतला आहे. महापूर असो व करोनाची महामारी असो अशा बिकट प्रसंगी मंडळाचे कार्यकर्ते धावून तर गेलेच, पण एकल कुटुंब, वृद्ध यांच्या रोजच्या जेवणाची व्यवस्थाही मंडळाचे कार्यकर्ते घरचेच समजून आजही करीत आहेत.

मात्र, अलिकडच्या काळात केवळ भांडणातच नव्हे तर सहज संवाद साधत असताना शिवीचा प्रकार बोकाळला आहे. शिवी देणारा आणि खाणाऱ्यालाही या शिवीचे काहीच वाटेनासे झाले आहे. मात्र, या अपशब्दामधून बदनामी होणारी महिला कोणाची तरी आई, बहीण, पत्नी, अशा नात्यातीलच असते. यामुळे शिवीच्या माध्यमातून होणारा महिलांचा अवमान रोखण्यासाठी मंडळाने शिवीमुक्त कट्ट्याची कल्पना पुढे आणली असून याचे उद्घाटन स्वातंत्र्यदिनी करण्यात आले.

सुखदुःखाच्या गोष्टी करण्यासाठी एकत्र जमण्यासाठीचा कट्टाच आता शिवीमुक्त करण्यात आला आहे. तसा फलकच या ठिकाणी लावण्यात आला आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती
मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वतःची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958

CAFÉ ROCKSTARZ
EAT . CHILL . REPEAT
11:11
ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# लोककवी वामनदादा कर्डक




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**लोककवी वामनदादा कर्डक  महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची १५ ऑगस्ट रोजी १०१ वि जयंती होती. त्यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख. वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही.**

घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची सैनिक समता दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे



बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या  भाषणांमधून  केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे.... तुझे गीत व्हावे मानवता. आंबेडकर भक्ती, दलित, शोषित,  स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार,  शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना १०१ जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

# मराठी लोकसंस्कृतीची शान : लावणी

आधुनिक केसरी

**लावणी ही श्रृंगाराची खाण आणि महाराष्ट्राची शान आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शाहीर साबळे, आत्माराम पाटील,  शाहिर अण्णाभाऊ साठे , शाहिर अमर शेख यासारख्या शाहिरांनी मुंबईचे वर्णन करणाऱ्या लावण्या लिहिल्या, त्यात मुंबईतील बेकारांची समस्या,गिरणी कामगाराचे दुःख,अन्नासाठी होणारे गोरगरीब मुलांचे हाल, निवा-याची गैरसोय, वाढती लोकसंख्या अशा अनेक प्रश्नांना लावणीतून व्यक्त केले. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांनी शाहिरांना आश्रय दिला. परशुराम, प्रभाकर, सगन भाऊ, सवाई फंदी, रामा गोंधळी, बाकेराव यांनी लावणी जिवंत ठेवली,मराठी माणसाच्या मनाला सुख मिळवन देण्याचे काम पूर्वीपासूनच लावणीने केले आहे.**

प्रसिद्ध नृत्यांगना सुलोचना चव्हाण यांना महाराष्ट्र शासनाने पद्मश्री हा किताब बहाल केला. होनाजी बाळाने लावणीला प्रकाशाच्या झोतात आणले. परंतु अलीकडे लावणीमध्ये चुकीच्या अदा, हालचाल,अयोग्य हातवारे,अंगप्रदर्शन यामुळे लावणी बदनाम होण्याच्या मार्गावर आहे. ही लावणी आता अश्लील व विकृती कडे जाते की काय ? अशी भीती  अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे.त्यामुळेच हा लेखन प्रपंच.........

लवण या शब्दावरून लावण्य गीत वा लावणी शब्द तयार झाला आहे. लावणी हा एक पारंपरिक गायन आणि नृत्य प्रकार आहे. ढोलकी व पेटी या वाद्यांचा लावणी सादर करताना प्रामुख्याने वापर केला जातो. लावणीचा जोश पूर्ण ठेका हे त्याचे वैशिष्ट्ये आहे.ढोलकीच्या तालावर लावणी सादर केली जाते.लावणी हा महाराष्ट्रातील लोकनाट्य शैलीतील तमाशाचा एक प्रकार आहे.लावणी हा तर तमाशाचा आत्मा आहे.लावणीला फार मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. वर्षानुवर्ष ते मराठी रसिकावर राज्य करत आहे. आजही लोकप्रियतेच्या शिखरावर लावणीच आहे, म्हणूनच मराठी संस्कृतीची शान असलेल्या लावणीला लोकप्रिय करण्यात अनेक शाहीर, कलावंत, गायक,गायिका यांचे योगदान फार मोठे आहे. मराठी, हिंदी, उर्दू, गुजराती नाटकांमध्येही लावणी गायली जाते,नाव गाव कशाला पुसता ,अहो मी आहे कोल्हापूरची ही सुलोचना चव्हाण यांनी गायलेले लावणी मराठी रसिकांना आजही ठेका धरायला लावते, पदरावरती जरतारीचा पाडाला पिकलाय आंबा  मला म्हणतात लवंगी मिरची  *आई मला नेसव शालू नवा अशा लावणीने खरोखरच मराठी मनाला आनंद मिळवून देण्याचे काम केले. कलाक्षेत्रातील योगदाना बद्दल सुलोचना चव्हाण यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. लावणी हा कलाप्रकार शृंगार व भक्ती या रसाचा परिपोष करण्यासाठी पूरक माध्यम समजला जातो. लावणीही संगीत, कविता, नृत्य आणि रंगमंचाने बनलेले असते, लावणी नृत्यशैलीमुळे मराठी लोकनाट्याच्या वाढीस मोठा हातभार लागला आहे.लावणी हे आपल्या प्रियसीच्या आगमनाची वाट पाहणाऱ्या स्त्रीने गायलेले प्रेमगीत म्हणून ओळखले जाते. फडाची लावणी आणि बैठकीची लावणी अशी दोन स्वतंत्र प्रकार आहेत. फडाची लावणी नाट्यगृहात तर बैठकीची लावणी खास श्रोत्यासमोर बसलेल्या महिलेला सादर करावयाची असते. महाराष्ट्रात विविध पारंपरिक नृत्य सादर केले जातात. लावणी हे नृत्य सर्वात प्रसिद्ध आहे.नऊ मीटर लांबीची पारंपरिक साडी आणि पायात घुंगरू बांधलेले, सोळा अलंकार परिधान करून शरीराच्या अदा ठेक्यात करणे. अशी वेशभूषा, केशभूषा, गजरा लावून ओठावर लाली भुवया रंगवून नजरेत कामुक भावना ठेवून या रावजी बसा भावजी म्हणून प्रेक्षकांना मोहनी टाकते. ढोलकी वर थाप, घुंगराची साथ,रूपवतीचा ठुमका आणि मनाला चटका लावणारे ठसकेबाज शब्द लावणीत असतात.

लावणी,लोकनृत्य, समाज, राजकारण, धर्म आणि प्रणय या विषयावर आधारित आहे.सुरुवातीच्या लावणीची रचना ही क्षेत्रवर्णन,भक्तीपर, अध्यात्मिक उपदेशपर  होती, पण पुढे मस्तानी बरोबर आलेले नाच गाणे लावणीच्या विकासाला पूरक ठरली.  युद्ध करून थकलेल्या योदध्यासाठी मनोरंजन आणि मनोबल वाढविण्याचे काम लावणीने केले .मला लागली कुणाची उचकी, ह्याची का त्याची असे म्हणून जीव ओवाळून टाकले. गोंधळ, पोवाडे ,लावणी आणि भारुडे या प्रकारात लावणीने कमाल केली, दोन अर्थाचे शब्द बोलून मनाला निखळ मनोरंजन मिळवून देण्याचे काम लावणी करते. कस काय पाटील बरं आहे काय ? सुरेखा पुणेकर ही लावणी सम्राज्ञी एक अक्षरही शिकली नाही तरीही सर्व प्रकारच्या लावण्या ती सादर करते. मला प्रीतीच्या झुल्यात झुलवा, कारभारी दमानं, पिकल्या पानाचा देठ ,की हो हिरवा, इचार काय हाय तुमचा ?अशा एकापेक्षा एक सरस लावण्या गाऊन मराठी संस्कृतीला उंची वर घेऊन जायाचं काम त्यांनी केलेले आहे. पंचवीस वर्षापासून अकलूज येथे राज्यस्तरीय लावणी महोत्सवाचे आयोजन केले जाते. आजही तिथे छुमूक छुमूक आवाज घुमतो.



पूर्वी  लावणीत सौंदर्य दिसायचं! आता ते दिसत नाही. पूर्वी पारंपरिक लावणी होती,आता चित्रपटातील गाण्यावर नृत्य करावे लागते.लावणी सम्राज्ञी म्हणून मंगला बनसोडे यांचे नाव घेतले जाते, त्यांना महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रपती पुरस्कार दिला आहे.तसेच सामाजिक न्याय हा सुद्धा पुरस्कार त्यांना बहाल करण्यात आलेला आहे.कांताबाई सातारकर अशा या सर्व लावणी सम्राज्ञीने महाराष्ट्राची लोकपरंपरा, लोककला जिवंत ठेवण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केलेले आहे,त्यांचा मुलगा सोंगाड्या रघुवीर खेडकर हे बहुआयामी व्यक्तीमत्व असून त्यांना पठ्ठे बापुराव राज्यस्तरीय पुरस्कार पुणे येथे बहाल करण्यात आला, सतत चार दशके त्यांनी लोकांच्या मनावर अधिराज्य केले. लोकांना खळखळून हसवले आहे. तमाशा फड मालक संघटनेचे राज्याचे ते अध्यक्ष आहेत. नटरंग मधील  अप्सरा आली, मला जाऊ द्या ना घरी या लावणीने महाराष्ट्राला वेड लावले आहे. मराठी रसिक सुद्धा या लावणीच्या प्रेमात पडू लागले आहेत. ना. धो. महानोर ,राम जोशी, आनंद फंदी यांनीही लावणीला चाल दिली.

कलगीतुरे सवाल-जवाबाने रंगू लागले.पेशवेच्या काळात लावणीने वेगळा साज घातला होता. दुसऱ्या बाजीरावांनी राज्यरोहणापासून ते राज्यत्यागापर्यंत चैनबाजी आणि कुपात्री दान केले. शिमगा महोत्सव पाच दिवस चालत असे, त्यावेळेस अनेक शाहिरांनी लावणी रचना तयार केली असे सांगता येते,परंतु अली कडच्या काळामध्ये लावणीला उतरती कळा लागली आहे. ग्रामीण भागात जत्रेमध्ये तमाशा येत असला तरी लोक जास्तीत जास्त तमाशाकडे जात नाहीत.  वग ऐकत नाहीत,कारण प्रत्येकाच्या हातात आज मोबाईल आल्यामुळे हवे ते गाणे व लावणी घरी बसून सुद्धा पाहता येते,त्यामुळे तमाशाचे दिवस सध्या वाईट आले आहेत. खर्च आणि कलाकारांना वेतन यांचा ताळमेळ बसत नाही,असे ऐकण्यास येते, यापुढे कलाकारांना मानधन वाढविले तर या कलेकडे अनेक कलाकार येतील, वार्धक्यात अनेक कलाकारांना उपाशी राहण्याची वेळ येत आहे, ही वास्तविकता आहे.



लावणी जिवंत ठेवायचे असेल, लावणीला पूर्वीचे वैभव आणायचे असेल तर लावणीवर साधकबाधक विचार होणे गरजेचे आहे. त्यासाठी अभ्यासक्रमात एखाद्या पाठ ठेवले तर ही कला जिवंत राहील, लावणी हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण ठेवा आहे , ही लावणी सातासमुद्रापार गेलेली आहे,तिच्या मुळे मराठी पाऊल पुढे पडत आहे, त्यामुळे लावणी ही लोकसंस्कृती निखळ मनोरंजन करण्याचे कार्य करते, पुढील पिढी साठी लावणी हा प्रकार समाजामध्ये रूढ होणे महत्त्वाचे आहे.म्हणून प्रत्येक तालुक्यात दरवर्षी लावणी महोत्सवाचे आयोजन करण्यात यावे.

**प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपत**
**अध्यक्ष :विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी**
**ता.मुखेड, जि.नांदेड**



# हे जीवन सुंदर आहे!

आधुनिक केसरी

आपल्याला हे ईश्वराने सुंदर जीवन दिले आहे. आपण खऱ्या अर्थाने त्या जीवनाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. आपण सतत पैशाच्या मागे धावतो आहोत.आपण आयुष्यात कितीही कमवून ठेवले तरी बाकी शुन्यच राहते. संकटसमयी कामाला येते ते आपले कर्म, साठवलेले पुण्य त्यासाठी जीवनामध्ये आपले आचार विचार चांगले असले पाहिजे. एखादी गोष्ट आपल्याला नाही मिळाली तर  दुःखी होऊ नका. जे आहे त्यात आंनदी रहा.

आपल्याजवळ काही नसु द्या. पण दुसऱ्याला प्रेम , सन्मान देता आला पाहिजे. जीवन ही एक जगण्याची कला आहे. ती आपण आत्मसात केली पाहिजे.जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन नेहमी सकारात्मक असला पाहिजे. आपले जीवन हे प्रकाशमान करावे. स्वताःची वेगळी ओळख निर्माण करता आली पाहिजे. आपल्या जीवनाचे लक्ष्य निर्धारित करून ते साध्य करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आपला स्वभाव प्रेमळ, गोड असलाना जीवनात काही कमी पडत नाही. आयुष्याचा पाठलाग करताना आपण धडपडतो पडतो. पडलो तरी हरकत नाही. पुन्हा ऊठुन धावायला लागा.मनात जिंकण्याची जिद्द चिकाटी आणि आत्मविश्वास असला पाहिजे. आयुष्यात सुख दुःख येतच असतात. चांगल्या माणसांना तर नक्कीच येतात. तेव्हा आपल्या जीवनात किती क्षण आहेत. याचा विचार करत बसण्यापेक्षा आपल्याला जो क्षण मिळाला आहे. तो सुंदर करा. आयुष्य भरभरून जगा. जीवन सुंदर करण्यासाठी रोज चांगले लक्षात ठेवा व वाईटाला विसरून जा. मनमोकळे जगा चांगले बोला , चांगले वागा, प्रेमाचा झरा ह्रदयात स्फुरत ठेवा. आपल्या हे सुंदर जीवन लाभले आहे. आपले जीवन वाहत्या पाण्याप्रमाणे असले पाहिजे. भुतकाळात न रमता सतत वर्तमानकाळात जगण्याचा प्रयत्न करावा. आपल्याला मिळालेले हे सुंदर जीवन आहे .त्याचा जीवनात सदुपयोग करा.

**संतोष दत्तू शिंदे, मो.७७२१०४५८४५**

# बीड जिल्ह्यात शिल्लक पाऊस पडणार का ?



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**जुन, जुलै पावसाळ्याचे आले तसे गेले. डोक्यावरचे केस भिजतील एवढाच पाऊस बीड जिल्ह्यात झाला. कोरडाईवर खरीपाच्या पेरण्या केल्या. तुरूळक पावसाने सोयाबीन, कापुस, कडधान्ये उगवुन बाहेर आले. अगोदरच पेरण्याला उशिर झाला. साऱ्या देशात पावसाने धुमाकुळ घातला पण आपल्या जिल्ह्यात मात्र भर पावसाळ्यात उन्हाळ्यासारखी स्थिती. आता केवळ दिड महिना उरला. प्राप्त परिस्थितीत नदी, नाले, धरणे कोरडी ठणक असुन खरीपाची पिके अंतिम श्वास घेताना दिसतात. पाऊस पडेल का?यावर आता लोकांचा विश्वास राहिला नाही. हवामान खाते असो किंवा पंजाबराव डक असो सर्वाचे अंदाज जिल्ह्याबाबतीत फेल गेले. श्रावणाच्या तोंडावर बळीराजाची चेहरे कालवंडली असुन पाचावर बसल्यासारखीच झाली आहेत. खरंच पाऊस पडेल का?यावरच विश्वास नाही. ऊसासारखं उत्पादन देखील धोक्यात आल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी बोलुन दाखविली.**

सुरूवातीला हवामान खाते यंदा बऱ्यापैकी असल्याचे सांगितल्या गेलं. पण काहीही म्हणा बीड जिल्ह्याला यंदा वरूण राजाने आपल्या हजेरीपटावरूनच काढून टाकलं की काय ? अशी शंका आता येवु लागली. मुळात जुनचा पाऊस वेळेवर पडला नाही. जुलैच्या पहिल्या आठवड्यात तुरूळक पडला. तेवढ्याच ओलीवर पेरण्या झाल्या. जुन महिना कोरडा जाणं हाच खरा आत्मघातकी बाँब खरीपाच्या पेरणीसाठी आणि उत्पादनासाठी म्हणावा लागेल. जुलैमध्ये साऱ्या महाराष्ट्राला गवसणी घातली पण मराठवाड्यातल्या नांदेड वगळता सातही जिल्ह्यात हवा तसा पाऊस पडला नाही. बाहेरचे जिल्हे सोडा पण बीड जिल्ह्यातल्या सर्व तालुक्यात सद्यस्थिती भयानक झाली असुन खरीपाची शंभर टक्के पिके धोक्यात आली. सर्वसामान्य शेतकऱ्यांनी दागदागिने मोडून पेरण्या केल्या पण उगवणीच्या काळालाच दडी मारली तर काही ठिकाणी महिन्यापासुन पाऊस नाही. अडीच महिना संपत आले तरीही एकही पाऊस मोठा बीड जिल्ह्यातल्या कुठल्याही तालुक्यात झाला नाही.भुरभुऱ्या पावसावर खरीपाची पिके आणि चाऱ्याचं भलं झालं वाटत असलं तरी पुन्हा पंधरा दिवसापासुन मारलेली दडी अत्यंत धोक्याची वाटते. खरंच पुर्वीसारखा दुष्काळ जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाड्यात पडतो की काय अशी शक्यता निर्माण झाली. कारण पाऊस पडणार असा अंदाज हवामान खातं आणि पंजाब डकनं दिल्यानंतरही वरूण राजाने हुलकावणी यंदाच्या पावसाळ्यात दिली. 15 ऑगस्टनंतर अंदाज सांगत असला तरी आता लोकांचा भरवसा 100 टक्के उडालेला दिसतो. सोयाबीन, कपासीला पाणी देण्यास शेतकऱ्यांनी सुरूवात केली. उत्पादन वाढीला आलं असताना नरडीला नख लावल्यासारखं वरूण राजाने केल्याचे चित्र जाणवतं. विशेष म्हणजे ऊसाचे उत्पादन खऱ्या अर्थाने जुलै आणि ऑगस्टच्या पडणाऱ्या पावसावर मोठी वाढ होत असते. पण गंमत बघा, जुन,जुलै आणि अर्धा ऑगस्ट पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे ऊस उत्पादक हैराण झाले. विहीरी आणि तलाव आटल्याने पाणी नाही तर बोरलाही पाणी येत नाही. पाऊस पडेल म्हणून शेतकऱ्यांनी खत पाणी घातलं. पण मारलेली दडी फार मोठं संकट येवु घालते की काय ? अशी आता शक्यता वाटते. 15 ऑगस्टनंतर अंदाज बोलल्या जातो पण मागच्या दोन महिन्यातले अंदाज बीड जिल्ह्याबाबतीत चुकीचे ठरले असुन मोठा पाऊसच न झाल्याने फार मोठं नुकसान होण्याची शक्यता प्रगत शेतकरी महादेव आबा पवार आणि माधवराव दहिफळे यांनी बोलुन दाखविली. आष्टी, पाटोदा, शिरूर, केज, बीड, गेवराई, माजलगाव, धारूर, केज, वडवणी, परळी आदी तालुक्यात सद्यस्थिती हिरवीगार वाटत असली तरी उत्पादनावर मोठा फरक होईल. कारण वेळेवर पाऊस पडलेलाच नाही. अजुन चार दिवस पाऊस नाही पडला तर 100 टक्के बीड जिल्ह्यात खरीप उत्पादन शेतकऱ्यांच्या हातुन गेल्यात जमा. केंद्र सरकारने एक रूपायात विमा देवु केला. मोठ्या प्रमाणावर खरीपाचा विमा शेतकऱ्यांनी भरला. कदाचित विमा कंपनीचे आलेले अनुभव पहाता येणारा काळ ठरवेल पण शेतकऱ्यांच्या पदरात उत्पादन भरमसाठ पडणं महत्वाचं असतं. शेवटी शासनाचे अनुदान असेल किंवा विमा असेल हा तात्पुरता दिलासा मनाला धीर देण्यासाठी कामी येवु शकतो. पण ज्या एकरात पन्नास हजार रूपये उत्पादन शेतकरी काढतात तिथे पाच हजार काय करणार ? हे अगदी खरचंय की भर पावसाळ्यात बीड जिल्ह्यात उन्हाळ्यासारखी स्थिती झाली असुन वाढत असलेला उकाडा आणि तापत असलेला सुर्य हे फार मोठं संकट येवु घालतय का ? असा सवाल केजमधील भाजपा नेते रमाकांत बापु मुंडेंनी केला.




ढोरगाव, ता.माजलगाव शेतकरी अशोक थोरात, कल्याण माने, नरेंद्र जोशी, मायकर, उतरेश्वर माने, कल्याणराव कदम, अमोल मुळी या सर्व शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली. घरबसल्या घास गोड लागेना, पाऊस कसा येईना ? नजरा लागल्या आभाळाकडे अशी परिस्थिती निर्माण झालेली वाटते. आता पाऊस पडणार असं भाकित असलं तरी लोकांचा विश्वास राहिलाच नाही. कारण अडीच महिन्यापासुन पाण्याचा थेंब नाही. पाणी पातळी खोल गेली. भर पावसाळ्यात बोरींग बंद पडलेले दिसते. धुनकवाडचे प्रगत शेतकरी कल्याणराव कुलकर्णी म्हणतात, जर पाऊस पडला तरच काही खरं अन्यथा शेतकरी मेल्याशिवाय रहाणार नाहीत. उत्पादनावर मोठा परिणाम होणार. ऊसाचे उत्पादन घटणार आणि खरीपाला पाऊस नाही पडला तर मग रब्बीचे त्याहुन फार मोठं आवाहन अधिक असु शकतं. परमेश्वराकडे प्रार्थना याशिवाय दुसरं कुणी काहीच करू शकत नाही पण आमच्या मनात भिती निर्माण झाल्याचं कुलकर्णी म्हणाले. वाघबेटचे शेतकरी बालासाहेब गित्तेंनी अर्धा पावसाळा झाला आम्हाला तर हे दिवस उन्हाळ्याचेच वाटतात या शब्दांत भावना बोलुन दाखवल्या. धोंडीरामदादा कोपले, ठाकुर उदयसिंह दिख्खत यांनी देखील चिंता व्यक्त केली.

बाकी काही असलं तरी फार मोठं अस्मानी संकट बीड जिल्ह्यावर पुन्हा ओढवताना दिसतं. शिल्लक पावसाळ्यात किमान पाणीसाठा होईल आणि रब्बी पिकाचा प्रश्न सुटेल एवढा पाऊस झाला तरी समाधानाचं म्हणावे लागेल अशी भावना आता शेतकऱ्यांच्या मनातली दिसते. साखर कारखाने 2024गाळप हंगामाच्या तयारीला लागत असले तरी ऊस उत्पादन घटले तर फार मोठं संकट कारखानदारीवरच येवु शकतं. त्यातही जुलै, ऑगस्टचा पाऊस न पडल्याने सद्यस्थितीत उत्पादन निश्चित घटणार त्यामुळे शेतकऱ्यांसह कारखानदारानाही चिंता उद्याची लागलेली दिसते. बाकी काही असलं तरी शिल्लक दिवसात राहिलेला पाऊस मोठ्या फरकाने पडावा अशी शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनतेची सुद्धा ईश्वराकडे प्रार्थना आहे. बघुया नेमकं काय घडतंय ?



## फरशी फाटा येथे शरद पवार यांचे जंगी स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** बुधवारी सकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे फरशी फाटा येथे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी डॉक्टर अनिल वाघ, सुधाकर तुपे, मीठू पारखे, धनराज पारखे, शेख अजीज, मकसूद मामा, छगनराव कोलते, नाना कोलते ,सुधाकर कोलते, बाबुराव सोमदे ,गणेश वाघ, सचिन तोरणमाळ ,साईनाथ बेडके, मल्हारी पाटील तुपे, काशिनाथ वाघ, रखमाजी कापरे, सर्जेराव कापरे, गणेश शिंदे, साहेबराव तुपे, दीपक तुपे, सुनील कबाडे, बाळू तुपे, सखाराम वाघ, दादाराव वाघ ,गवणाजी तुपे, किशोर देवकर, सोमीनाथ डीडोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे फरशी फाटा येथे स्वागत करण्यात आले.

## शब्दगंध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ.पुरुषोत्तम भापकर

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** येथील शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या पंधराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, माजी सनदी अधिकारी डॉ. पुरुषोत्तम भापकर यांची निवड करण्यात आली आह. अशी माहिती अहमदनगर शहराचे आमदार तथा स्वागताध्यक्ष संग्रामभैया जगताप व शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी यांनी दिली.

डॉ. पुरुषोत्तम भापकर यांचे चांदणं उन्हातलं, आकांत शांतीचा ( काव्यसंग्रह ), पुरुषार्थाला साथ चौथ्या स्तंभाची, हे शक्य आहे, अग्रेसर मराठवाडा, भाऊ दीदी साथी नव्या युगाचे,शैक्षणिक षटकार इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांनी शोध मुलांच्या मनाचा, गुणवत्तेचे शिलेदार, शासकीय योजनांचा खजिना इत्यादी पुस्तकांचे संपादन केलेले आहे. डॉ. भापकर यांच्यावर औरंगाबाद लीडिंग टू वाईड रोडस, स्वच्छतेचा वारकरी, प्रशासनातील पुरुषोत्तम इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत.

भेटला विठ्ठल, मी वंदन महाराष्ट्राला,महाराष्ट्र माझी आण, ध्यास गुणवत्ता, माझ्या श्वासात तू, मराठी माझी,मनभावन, चांदणे उन्हातले, तुषार्त, चंद्र पाहिला मी जरा, मी एकटा आहे किती, सखे तुला काय म्हणू, सखे तुझ्यासाठी, लावण्य, आता साठव थेंब थेंब पाणी इत्यादी ऑडिओ व्हिडिओसिडीज व अल्बम प्रकाशित आहेत.

डॉ.पुरुषोत्तम भापकर हे शेवगाव तालुक्याचे भूमिपुत्र असून एम.ए. अर्थशास्त्र, एलएलबी, पीएचडी, ( कृषी अर्थशास्त्र ) असे त्यांचे शिक्षण झाले आहे. जळगाव, धुळे निफाड, मालेगाव,पुणे येथे उपजिल्हाधिकारी,पुणे येथे पुनर्वसन उपायुक्त, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे कुलसचिव,नाशिक विभागाचे महसूल उपायुक्त,परभणी, धुळे व पुणे येथे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून तर अमरावतीचे जिल्हाधिकारी म्हणून ते कार्यरत होते. त्यांनी औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त, नगरविकास प्रशासन संचालनालयाचे आयुक्त व संचालक,अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त, शिक्षण आयुक्त, जलसंधारण व रोहयो विभागाचे सचिव,औरंगाबाद विभागाचे विभागीय आयुक्त, क्रीडा व युवक सेवा विभागाचे आयुक्त म्हणून काम पाहिलेले आहे.त्यांना राष्ट्रपती सिल्वर मेडल,सर्वोत्कृष्ट अतिरिक्त जिल्हाधिकारी,भारत ज्योती अवार्ड,वीर एकलव्य राष्ट्रीय पुरस्कार यासह २५ हून अधिक राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत.

त्यांच्या हे शक्य आहे या पुस्तकास महाराष्ट्र शासनाचा यशवंतराव चव्हाण सर्वोत्कृष्ट वाडमःय पुरस्कार मिळालेला आहे. डॉ.पुरुषोत्तम भापकर यांच्यावर पुरुषोत्तम या नावाने मराठी चित्रपट प्रदर्शित झालेला आहे.

शब्दगंध साहित्यिक परिषदेचे मार्गदर्शक प्राचार्य जी.पी.ढाकणे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने त्यांची एकमताने ऑक्टोबर मध्ये अहमदनगर येथे होणाऱ्या पंधराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड केलेली आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, खजिनदार भगवान राऊत, संयोजन समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, मार्गदर्शक बापूसाहेब भोसले, कार्याध्यक्ष डॉ.अशोक कानडे, डॉ. गणी पटेल, प्रा.डॉ.संजय पाईकराव, डॉ. शेषराव पठाडे, अजित कोरटकर, डी एस काटे, बी. एस. राऊत, तानाजी शेटे यांनी अभिनंदन केले आहे.

## मनपात आयुक्त विपीन पालीवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सांगता 30 ऑगस्ट रोजी होत असून यावर्षीचा स्वातंत्र्यदिन अमृत महोत्सवात साजरा होणारा असल्याचे महत्व लक्षात घेत चंद्रपूर महानगरपालिका मुख्यालय येथे १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या ७६ वा वर्धापनदिनी आयुक्त विपीन पालीवाल यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी उपायुक्त अशोक गराटे, उपायुक्त मंगेश खवले, शहर अभियंता महेश बारई, मुख्य लेखाधिकारी मनोहर बागडे यांच्यासह सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी वृंदाप्रमाणेच नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव साजरा करीत असताना



जनतेच्या मनात भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती चिरंतन तेवत रहाव्यात तसेच देशभक्तीची जाज्वल्य भावना मनात कायम रहावी या भावनेने आपल्या इतिहासाचे अभिमानपूर्वक स्मरण करण्याच्या उद्देशाने 'हर घर तिरंगा' म्हणजेच घरोघरी तिरंगा उपक्रम राबविण्यात आला यात ६० हजार घरी निःशुल्क ध्वज वितरण करण्यात आले. तसेच मेरी माटी मेरा देश म्हणजेच माझी माती माझा देश अभियानातंर्गत विविध उपक्रम सुद्धा राबविण्यात आले.



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात माजी पंतप्रधान श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांना पुण्यतिथी निमित्ताने बुधवारी आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते.**

# घोषणा झाल्या कृती मात्र शून्य ! अशोक चव्हाणांची भाजपावर टीका

## नागापूर येथील विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** राज्यात सध्या लोकाभिमुख कामाबाबत कुणीच काही बोलत नाही. वेगळ राजकारणात सूरू आहे.कोण कुणासोबत आहे हेच कळायला तयार नाही.भाजपा सरकारने अनेक विकासाच्या घोषणा केल्या हे चांगल झाल पण प्रत्यक्षात कृती मात्र शून्य आहे अशी टीका माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी सोमवारी ( ता. १४ ) केली आहे.

नागापूर ( ता.भोकर ) येथील विविध विकास कामांचा लोकार्पण व भुमिपूजन सोहळा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी आमदार अमर राजूरकर, जिल्हाअध्यक्ष गोविंद शिंदे नागेलीकर, सौ.मंगाराणी अंबुलगेकर, सुलोचनाबाई ढोले, बालाजी आंदबोरीकर,जगदिश पाटील भोसीकर, बाळासाहेब पाटील रावणगावकर, प्रकाश देशमुख भोसीकर, भगवान दंडवे, आत्रिक पाटील मुंगल, नामदेव आयलवाड, सुयश पोकलवार, बालाजी शानमवाड, गोविंद पाटील गौड, माधव अमृतवाड, मनोज गीमेकर,सारंग मुदंडा , रामचंद्र मुसळे,विठ्ठल धोंडगे , आदिनाथ चिंताकूठे, मिर्झा ताहेर बेग, संदीप गौड,विक्रम क्षिरसागर,गणेश राठोड,ओबीसी सेलचे बी.आर.पांचाळ,यांची उपस्थिती होती.श्री.चव्हाण म्हणाले की, ज्या मतदारसंघात कै.शंकरराव चव्हाण यांनी नेतृत्व केल तोच मतदारसंघ मी हक्काने मागून घेतला.

जनतेनी मला भरभरून प्रेम दिल.तुमची मनोभावे सेवा करता आली यात मी समाधानी आहे.जो पर्यंत तुम्ही माझ्या सोबत आहात तो पर्यंत प्रामाणिक काम खरत राहिल.भोकर तालुख्यास नेहमीच झूखत माप दिले आहे.त्यामुळे आता तालुका राजकीय पटलावार विकासाच माडल बनल आहे.मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पाणी व शेती सिंचनाचा प्रश्न निकाली निघणार आहे.आणखी बरीच कामे पुर्ण करावयाची आहेत.काहिलोक दगड बसवून उद्घाटन करीत आहेत ती कामे त्या दगडा सारखी स्थितप्रज्ञ होऊन बसले आहेत.मी जे बोलतो ते करुन दाखवतो असे सांगितले.




**माझे पाय जमिनीवर आहेत :** मी राजकारणात प्रारंभी पासून लोकसेवेचा वसा हाती घेतला आहे .माझ्या वडीलांनी दिलेल्या विचाराची शिदोरी पाठीवर घेऊन काम करतो आहे .माझ्यावर राज्याची जबाबदारी असली तरी तुमची गैरसोय होऊ नये म्हणून माझे शिलेदार डोळ्यात तेल घालून चांगल काम करीत आहेत म्हणून मी राजकारणात टिकुन आहे .काहिजण हवेत तरंगत आहेत पण माझे पाय आजहि जमिनीवर आहेत असेमत श्री चव्हाण यांनी बोलताना व्यक्त केले आहे .

**सरकारची यंत्रणा कुचकामी आहे :** सध्याच्या सरकारनी भरपुर विकासाची कामे हाती घेतली असली तरी छोट्या छोट्या कामाची चर्चा विधानसभेत होते हे सरकारचे अपयश आहे . याचा अर्थ सरकारची स्थानिक पातळीवरील यंत्रणा कुचकामी आहे असे श्री . चव्हाण यांनी बोलताना सांगितले . प्रस्ताविक उपसभापती बालाजी शानमवाड यांनी केले, सुत्रसंचलन शिवाजी कदम यांनी केले .



# चंद्रपुरातील संस्थेद्वारे दखलपात्र संशोधन व्हावे : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद अंतर्गत चंद्रपूरात स्थापित सिकलसेल रिसर्च सेंटर येथे भारतीय स्वातंत्र्यांच्या 77 व्या वर्धापनदिनी राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी प्रथमच ध्वजारोहण करुन तिरंग्यास मानवंदना दिली. उपस्थितांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या ध्वजारोहण सोहळ्यास ICMR-CRMH च्या संचालक डॉ. मनिषा मडकाईकर, सहसंचालक प्रभाकर केदार, तांत्रिक अधिकारी उमेश ढुमणे यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. आपल्या मनोगतात हंसराज अहीर यांनी या संस्थेच्या संशोधन कार्याची दखल राष्ट्रीय पातळीवरच नव्हे तर जागतिक स्तरावर घेतली जाईल असे महनिय कार्य व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करीत संस्थेद्वारा होणाऱ्या भावी संशोधन कार्यास शुभेच्छा दिल्या. देशगौरव असलेले द्रष्टे नेतृत्व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे शुभहस्ते या रिसर्च सेंटरचे भुमिपूजन व उद्घाटन होणे हा दुग्धशर्करायोग असून मा. प्रधानमंत्र्याच्या नवनवीन संशोधन सिध्दतेच्या अपेक्षांना या रिसर्च सेंटरच्या माध्यमातून प्रत्यक्ष उतरविण्याचा प्रयत्न व्हावा असे आवाहन अहीर यांनी या प्रसंगी केले.

ते म्हणाले की, कोरोना महामारीच्या काळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात झालेले कार्य जागतिक पातळीवर वाखाणल्या गेले. देशाने निर्माण केलेली व्हॅक्सीन जगाने स्वीकारली. अनेक देशांतील लोकांनी या लसीचा फायदा घेतला. आज संशोधन क्षेत्रात भारताने उंच भरारी घेतली आहे. चांद्रयान-3 व अन्य क्षेत्रामध्ये भारताने संशोधन क्षेत्रात किर्तीमान स्थापित केले आहे. स्वातंत्र्याच्या 75 व्या वर्षांच्या अमृत महोत्सवी वाटचालीत अनेक नवनवीन किर्तीमान स्थापित करण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत. आता अमृत काळात संशोधनाचे आव्हान स्वीकारत ICMR ने सिकलसेल, हिमोफिलीया, थॅलिसिमीया यासारख्या आजाराच्या निर्मुलनासाठी संशोधन करित या संस्थेची मान उंचवावी असे आवाहन सुध्दा अहीर यांनी आपल्या भाषणातून केले.

# कृषिक्षेत्रात जिल्हा पायोनियर व्हावा : मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशाची लोकसंख्या वेगाने वाढत असून या वाढणाऱ्या लोकसंख्येमध्ये नागरिकांचे पोट भरण्याची क्षमता कोणत्याही उद्योगात नसून फक्त कृषी, मत्स्यसंवर्धन व वने या तीन क्षेत्रातच आहे. मत्स्यसंवर्धनात जिल्हा मॉडेल करण्यासाठी प्रयत्न केल्या जात आहे. मत्स्यव्यवसाय वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून मिशन जयकिसानच्या माध्यमातून शेतकऱ्यांची उत्पादकता वाढावी. कृषी क्षेत्रात जिल्हा पायोनियर व्हावा, यादृष्टीने गतीने कार्य केल्या जात असल्याचे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी केले.

कृषी भवन येथे आयोजित जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रीती हिरळकर, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, उपविभागीय कृषी अधिकारी नंदकुमार घोडमारे, तालुका कृषी अधिकारी भास्कर गायकवाड, राहुल पावडे, अंजली घोटेकर, राखी कंचर्लावार,डॉ.मंगेश गुलवाडे, नामदेव डाहूले, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी बांधव तसेच महिला बचत गटाच्या महिला आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

शहराची लोकसंख्या ही मोठी आहे . मात्र, या महोत्सवासाठी येणाऱ्यांची संख्या कमी आहे . बदलत्या स्वरूपात रानभाजी महोत्सवाची माहिती, व्हिडिओ किंवा क्युआर कोडच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करण्याच्या सूचना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना केल्या . शरीर आणि मनाचे उत्तम आरोग्य घडविणारा पदार्थ म्हणजे रानभाजी . त्यादृष्टीने, कृषी अधिकाऱ्यांनी या रानभाज्यांच्या प्रचारासाठी उत्तम नियोजन करावे . रानभाजीपासून तयार होणाऱ्या पदार्थांच्या स्पर्धा आयोजित कराव्यात . जेणेकरून, बचत गटातील महिलांना व गृहिणींना चविष्ट भाज्या कशा करता येईल ? तसेच रानभाज्यांचा उपयोग कशा पद्धतीने करावा याची माहिती मिळेल . यासाठी नागपूरमधील प्रसिद्ध आहारतज्ञ, मास्टरशेफ यांना रानभाजी महोत्सवात निमंत्रित करावे .

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी आवश्यक पोषणमूल्ये रानभाजीतून मिळत असते. बदलत्या आहाराचा प्रमुख पर्याय म्हणून रानभाज्यांकडे बघण्याची नितांत आवश्यकता आहे. दैनंदिन आहारात रानभाज्यांचा समावेश व्हावा तसेच नव्या पिढीला रानभाज्याची ओळख व्हावी, रानभाज्यांचे आहारातील महत्व पटवून देण्यासाठी रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात खाद्यपदार्थांच्या परंपरा आहेत. मात्र, हळूहळू पिझ्झा, बर्गर व इतर गोष्टींमुळे ह्या पंरपरा लुप्त व्हायला लागल्या आहेत. एकेकाळी आरोग्य संवर्धनाचे काम आजीच्या बटव्यातील भाजीतून व्हायचे. नवीन पिढीला रानभाज्यांचे आरोग्यासाठी असलेले महत्व व त्यांचे गुणधर्म माहिती नसल्याने जे खाद्य आरोग्यास अपायकारक असून देखील त्यांच्या मोहात पडली असल्याचे ते म्हणाले.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर देशात विश्वगौरव प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात शेतकरी व शेती यामध्ये वेगाने काम होत आहे. जिल्ह्यात दूध उत्पादन वाढविण्यासाठी मदर डेअरीसोबत बैठक घेण्यात येत आहे. शेतकरी आणि शेती सुखी आणि संपन्न करावयाची असल्यास विकेल तेच पिकवावे. शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा अतिशय उत्तम उपयोग करण्याची आवश्यकता आहे. यासाठी जिल्ह्यात सोमनाथ येथे अप्रतिम असे कृषी महाविद्यालय सुरू करण्यात येत असून अजयपूर येथे पंजाब नॅशनल बँकेच्या माध्यमातून अत्याधुनिक तंत्रज्ञान देणारे प्रशिक्षण केंद्र उभे राहत आहे. मिशन जयकिसानच्या माध्यमातून जिल्हा शेतीच्या क्षेत्रात वेगाने पुढे जाण्याच्या दृष्टीने कार्य करण्यात येत आहे. यावेळी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी रानभाज्यांची सविस्तर माहिती जाणून घेतली व कृषी विभागाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.



# कन्नड येथे विविध कार्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे 15 ऑगस्ट निमित्त आजादिका अमृत महोत्सव निमित्त घर घर तिरंगा या अंतर्गत तिन दिवस सर्व शासकीय निमशासकी कार्यालया मध्ये ध्वजारोहण करण्यात आले.

तसेच उपविभागीय कार्यालय तहसील कार्यालय पंचायत समिती कार्यालय नगरपालीका कन्नड येथे सजावट करून स्वातंत्र दिन साजरा करण्यात आला सकाळी 8 : 5 मिटाने तहसीलदार विद्याचरण कडवकरयांच्या हस्ते करण्यात आले. नगरपालिका येथे नंदकिशोर भोंबे यांच्या हस्ते करण्यात आले पंचायत समिती कार्यालय येथे गट विकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कृषी अधिकारी बाळराजे मुळीक, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे, दिनेश राजपुत ,विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे,मंडळ अधिकारी सतीश भदाणे, पुरवठा निरीक्षक वैभव तोंडे उद्योजक मनोज पवार, अहमद अली, पवन सोनवणे, शेख जावेद, साईनाथ आल्हाड यांची प्रमुख उपस्थीती होती. शहरातील शासकीय कार्यालय तसेच विविध शाळा मध्ये स्वातंत्र दिन साजरा करण्यात आला असुन शहरा मध्ये बाईक रॅलीचे सुध्दा आयोजन करून शहर वासीयांनी स्वातंत्र दिन मोठया उत्साहात साजरा केला. यावेळी राम पवार , काकासाहेब ठोकळ , बाळु आल्हाड, संजय शिंदे, संदिप नरवडे, मनोज देशमुख, रुपेश भारूका, पवन ठाकुर इत्यादीची उपस्थीती होती.

# स्वातंत्र्यदिनी वैजापुरात स्वातंत्र्यसैनिक, शहीद सैनिक कुटुंबीयांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय स्वातंत्र्य दिनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्र भक्ती पर गीत गायन, ,प्रभात फेरी,व स्वातंत्र्य सैनिक व माजी सैनिक व कुटुंबीय सन्मान करून मंगळवार ( ता,१५ ) रोजी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला,मुख्यशासकीय ध्वज समारोह उपजिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाला. तहसील कार्यालयात तहसीलदार सुनील सावंत, नगर पालिकेत प्रशासक तथा मुख्याधिकारी भागवत बिघोत, तर हुतात्मा जगन्नाथ भालेराव स्मारकात स्वातंत्र्य सैनिक जे, के,भालेराव,पंचायत समिती येथे प्रभारी गट विकास अधिकारी एच.आर. बोयनार यांनी व शाळा, महाविद्यालयात तसेच इतर कार्यालयात कार्यालय प्रमुख यांनी ध्वजारोहन केले. सूत्र संचलन व आभार जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. या कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक व सैनिक कुटुंबीय यांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी आ. रमेश पा. बोरनारे माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, मावळत्या नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी,उपनगराध्यक्ष साबेरखान, पो.नि. श्यामसुंदर कौठाळे, भुमीलेख अधिकारी बी. डी. मोरे वैजापूर शहर तलाठी गजानन जाधव यांनी नियोजन बद्ध कार्यक्रम आयोजन केले.



# तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांकरिता शिवसेनेचा स्वातंत्र्यदिनी एल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** देशाच्या स्वातंत्र्याचा ७७ वा वर्धापन दिन लाल किल्ला ते मोहल्ला सर्वत्र उत्साहात साजरा होतं असताना शिवसेनेने ( ठाकरे ) धर्माबाद तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नाकरिता एल्गार पुकारत उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी व शिवराज पा. मोकलीकर यांनी लाक्षणिक उपोषण करून सर्व प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष झाली आणि धर्माबाद तालुका निर्मिती होऊन २५ वर्ष झाली तरीही ज्या पंचायत समितीच्या कार्यालयातून ग्रामीण क्षेत्राच्या विकासाचे धोरण निर्मिती व अंमलबजावणी होते त्या कार्यालयाचे कामकाज ओसाड इमारतीतुन चालु आहे. तर मग तालुक्याचा विकास कसा होणार ? विकासकामाची अंमलबजावणी प्रभावी करायची असेल तर अद्यावत



सुविधानी युक्त कार्यालय मिळाले पाहिजे. पं. समितीला चांगली इमारत नाही आणि शहरातील पशु-वैद्यकीय दवाखान्याची ईमारत

> धर्माबाद तालुक्यात अद्यावत इमारती नसणे ही येथील आमदार वं खासदारांचे अपयश आहे .येथील ग्रामीण रुग्णालय शोभेची वस्तू बनली असून येथील वैद्यकीय अधिकारीपासून ते शिपाई पर्यंत २७ पदे मंजूर असून यातील पन्नास टक्के जागा रिक्त आहेत . मग जनतेच्या आरोग्याचे प्रश्न कसे सुटतील ? आम्ही शिवसैनिक मात्र गप्प बसणार नसून प्रश्न सुटले नाहीत तर जनतेच्या हितासाठी आंदोलन करीत राहू .
>
> **गणेश गिरी, उप जिल्हाप्रमुख, शिवसेना ( ठाकरे गट )**

दोन वर्षांपासून तर राजापूर येथील आयुष्यमान रुग्णालयाची इमारत पाच वर्षापासून उदघाटनाच्या प्रतीक्षेत आहे. दुय्यम निबंधक कार्यालयाचा संसार तर भाड्याच्या खोलीत चालू आहे. डॉ. आंबेडकर वस्तीगृहाच्या इमारतीचे काम दहा वर्षांपासून चालू आहे. अजून ही अपूर्ण आहे. कस्तुरबा गांधी वस्तीगृहाच्या इमारतीचे दोन वर्षांपूर्वीच उदघाटन झाले आहे मात्र दुसऱ्याच पावसाळ्यात इमारतीला गळू लागले आहे.

दोन महिन्यापासून उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी आणि गट शिक्षणधिकारी नाही. जे आहेत ते येथे राहतच नाहीत. देवगिरीच्या वेळेप्रमाणे येथील शासकीय कार्यालय चालतात. वेअर हाऊसमध्ये काही व्यापारी साठेबाजी करून काळाबाजर करीत आहेत.तालुक्यात एकही शिंदीचे झाड नसताना राजरोस पणे शिंदीची भट्टी जोरात चालू आहे. खरं तर धर्माबाद तालुका निर्मिती झाल्यानंतर या भागाचा विकासाच्या गती वाढेल. यासाठी तालुका निर्मितीसाठी लढा उभारला गेला होता. मात्र तालुका तर निर्माण झाला मात्र आद्यवत इमारती आणि कुशल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा वाणवा आहे.

त्यामुळे हे प्रश्न तात्काळ सोडवावेत यासाठी उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी आणि शिवराज पा. मोकलीकर अनिल कमलाकर, मोरोती कागेरू, बालाजी बनसोडे, गजू कुरंदे यांनी लाक्षणिक उपोषण केले आहे.

# ऋषिकेश धायगुडे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** अहिरे, ता.खंडाळा येथे युवा नेते ऋषिकेश धायगुडे पाटील यांच्या



वाढदिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे."रक्तदान हेच श्रेष्ठदान" याचे महत्त्व लक्षात घेऊन शुक्रवार दि.१८ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आलेले आहे.या शिबिराचे उदघाटन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष व वर्धन सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन धैर्यशील दादा कदम, माजी आमदार व किसनवीर साखर कारखान्याचे माजी चेअरमन मदन दादा भोसले यांच्या प्रमूख उपस्थितीत करण्यात येणार आहे, अशी माहिती अविनाश भाऊ धायगुडे पाटील जनकल्याण प्रतिष्ठान व ऋषिकेश अविनाश धायगुडे पाटील मित्र परिवार यांच्या वतीने देण्यात आलेली आहे.

तसेच शैक्षणिक दृष्ट्या विद्यार्थ्यांना वह्या वाटप ही करण्यात येणार आहेत.सुमारे ५ हजार वह्यांचे वाटप केले जाणार आहे.अविनाश भाऊ धायगुडे पाटील अहिरे विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी च्या वतीने अहिरे येथील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा व गुणवंतांचा गुणगौरव हा विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.आरोग्याच्या दृष्टीने सामाजिक हित व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने महत्वपूर्ण अशा उपक्रमाने तालुक्याच्या युवा नेतृत्वाचा वाढदिवस संपन्न होत आहे.यासाठी कार्यकर्त्यांनी जोरदार अशी तयारी केलेली आहे.युवा नेत्याच्या वाढदिवसा निमित्त घेत असलेल्या उपक्रमामुळे कार्यकर्त्याकडून विशेष आनंद व्यक्त केला जात आहे.ऋषिकेश धायगुडे पाटील यांच्या समवेत त्यांच्या सुख दुःखात प्रत्येक ठिकाणी आमची साथ असल्याचे एकंदरीत त्यांच्या कार्यकर्त्यांकडून पाहायला मिळत असते.ऋषिकेश धायगुडे पाटील यांनी तालुक्यात तरुणांची एक चांगली फळी तयार केलेली आहे. खंडाळा तालुक्याचे तरुण तडफदार युवा नेतृत्व म्हणून ऋषिकेश धायगुडे पाटील यांच्या कडे पाहिले जाते.सर्वां मध्ये जाऊन मिसळणारे एक व्यक्तीमत्व खंडाळा तालुक्यात उदयास आलेले आहे.दिवंगत अविनाश भाऊ धायगुडे पाटील यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य ते करत आहेत.आजही खंडाळा तालुक्याचे नाव घेतले जाते तेव्हा दिवंगत अविनाश भाऊ यांच्या नावाची ही चर्चा होत असते.आज त्यांचेच सुपुत्र ऋषिकेश धायगुडे पाटील सामाजिक बांधिलकी जपत जनसेवे साठी काम करताना दिसत आहेत.खंडाळा पंचायत समितीच्या माजी सभापती वंदनाताई धायगुडे पाटील यांच्या मार्गदर्शना खाली ऋषिकेश धायगुडे पाटील हे त्यांचे सुपुत्र म्हणून मार्गक्रमण करत आहेत.अविनाश भाऊंच्या नंतर ही सामाजिक कार्यातून जनसेवेची नाळ कायम जपली आहे.त्यामुळे खंडाळा तालुक्यात आज एक चांगला जनसंपर्क असणारे नेतृत्व उदयास आलेले आहे.राजकीय दृष्ट्या निवडणुकीच्या रिंगणात सुद्धा ऋषिकेश धायगुडे पाटील यांचे मोठे आव्हान उभे राहिलेले आहे. ऋषिकेश धायगुडे पाटील यांच्या सारखे उमदे नेतृत्व आपल्याकडे असले पाहिजे हे सर्वच राजकीय पक्षांना वाटत असले तरी आज ज्या भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून ते जनतेच्या सेवेसाठी कार्यरत आहेत. त्या पक्षाच्या माध्यमातून सुद्धा पक्षातील आमदार खासदार ते थेट मंत्र्या पर्यंत जात भेटी गाठी घेऊन जनतेच्या समस्या व इथल्या तालुक्यातील विविध समस्या मांडण्याचा प्रयत्न करत आहेत. ऋषिकेश धायगुडे पाटील यांच्या सारख्या सक्षम नेतृत्वाचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा होत असल्याने या उपक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केलेले आहे.

# भोकरकरांच्या आपुलकीने ऊर्जा मिळाली : अमित राठोड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शासकीय सेवा म्हटलं की बदली ही ठरलेली असते. जीथे काही काळ सेवा दिली येथील आठवणी,आपूलकी जिव्हाळा कायम हृदयात घर करून असत. भोकरकरा कडुन मिळालेल्या आपूलकीन मला नवी ऊर्जा मिळाली.आपल्या सर्वांच्या सहकार्याने शासकीय योजना यशस्वी करता आल्या आहेत यात मी समाधानी आहे असे प्रतिपादन ऊपमुख्य कार्यकरी अधिकारी अमित राठोड यांनी मंगळवारी ( ता १५ ) केले आहे.

येथील पंचायत समितीचे तत्कालीन गटविकास अधिकारी यांची बदली होऊन ते नांदेड जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी पदी रुजू झाल्याने त्यांचा मंगळवारी ग्रामसेवक संघटनेच्या वतीने निरोप समारंभ व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी डी.एस.कदम होते. व्यासपीठावर बाजार



समितीचे उपसभापती बालाजी शानमवाड, कृषी अधिकारी संदीप कोसकेवाड, गटशिक्षणाधिकारी श्री.वाघमारे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष माधव अमृतवाड, यांची उपस्थिती होती. राठोड यांनी तालुक्यातील विकास कामे गतिमान करण्यासाठी प्रयत्न केले . ग्रामीण भागातील रखडलेल्या कामांना ख-या अर्थाने गती मिळाली .त्यांची नांदेड जिल्हा परिषद मनरेगा येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली आहे. प्रारंभी राठोड यांचा संपत्नीक सत्कार करण्यात आला. सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष माधवराव अमृतवाड,संचालक गणेश पाटील कापसे, किशोर पाटील, मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बी.आर. पांचाळ, ग्रामसेवक संघटनेचे बी.के. पाटील, गुलाब वडजे, अरविंद मुनगे,मुसळे, कासारळीकर,एम.जी.वाघमारे, यांनी राठोड यांच्या कार्याविषयी मत व्यक्त केली प्रास्ताविक बालाजी पाटील तर सुत्रसंचलन पवनकर यांनी केले आहे. ग्रामसेवक संघटनेचे बालाजी इंगळे, नरेंद्र काळे,विस्तार अधिकारी शेटवाड, कांबळे आदि सह ग्रामसेवक व कर्मचारी उपस्थित होते.

# अधिक मासात ६० हजार भाविकांनी घेतला प्रसादालयात लाभ

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** संस्थान श्री एकनाथ महाराज विश्वस्त मंडळ संचलित हरिकृपा सेवा समिती शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज प्रसादालय ( अन्नछत्रालयात ) अधिक मासानिमित्तने दक्षिण काशी पैठण नगरीत रोज हजारोंच्या संख्येने महिला तसेच पुरुषाची गर्दी असायची तीन वर्षा नंतर अधिक मास ( धोंडा ) या वर्षी जरा जास्तचीच गर्दी गोदावरी त स्नानासाठी दिसून आली.

यानिमित्ताने गंगा पुजन करुन धोंडेचे वान गंगेला वाहण्याची प्रथा असून रोज किमान हजारोंच्या संख्येने महिला पैठण नगरीत येत होत्या संत एकनाथ महाराज मंदिर परिसरात गेल्या सहा वर्षांपासून शांतीब्रम्ह एकनाथ महाराज संचलित हरी कृपा सेवा समितीच्या वतीने प्रसादालय ( अन्नछत्र ) सुरू करण्यात आले असुन

> अदिक मासात धोंड्याच्या महिना भरात प्रसादालयात जवळपास ६० हजार भाविकांनी भोजनाचा लाभ घेतला असुन, स्वामी हरी
>
> 
>
> चैतन्य महाप्रभूचे आशिर्वाद तसेच रोहयो मंत्री व संभाजीनगरचे पालकमंत्री संदीपान भुमरे साहेब यांचे मार्गदर्शन व स्वंयस्फुतीने काम करणाऱ्या सेवेकरीचा खूप मोठा वाटा व अन्नछत्रास लाभलेले रोजचे अन्नदाते या सर्वांच्या मदतीने शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज अन्नछत्र चे नाव देशपातळीवर पोहचले आहे . नाथाच्या दारी गेल्या सहा वर्षांपासून भोजनरुपी यज्ञाची अखंड सेवा करण्याची संधी आम्हाला मिळते त्यातच आम्ही सर्व सेवेकरी म्हणून भाग्य समजतो .
>
> **सतिश उदावंत ,अध्यक्ष शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज प्रसादालय पैठण**



अखंड प्रसादालय सूरू असून अदिक मासानिमित्तने महिणा भरात जवळपास ६० हजार भाविकांनी प्रसादालयात भोजनाचा अस्वाद घेतला असल्याची माहिती हरिकृपा सेवा समितीचे प्रसादालयाचे अध्यक्ष सतिश उदावंत यांनी दिली.

नाथ मंदिराच्या लगतच असलेल्या सुसज्ज अश्या इमारतीत अन्नछत्रालय सुरू करण्यात आले आहे एकाच वेळी शेकडो लोकांना महाराष्ट्रातील आणि देशभरातील भाविकांना हा महाप्रसाद अनेक दानशुरांच्या सहायोगातुन पुर्णत्वाकडे जात आहे. श्री हरीकृपा सेवा समिती चे सदस्य तसेच अनेक दानशुर भक्त मोठ्या श्रध्देने शांतिब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या चरणी ही अन्नदानाची सेवा देत असुन नित्य भोजन दुपारी १२ ते ३ वाजेच्या दरम्यान गेल्या सहा वर्षापासून अखंड कार्यरत आहे.कोरोना काळात या अन्नछत्रालयाचा अनेक भक्तांनी नागरिकांनी लाभ घेतला आहे.

# मुलींनी जिजाऊ, सावित्रीमाईंचे विचार समजून घेतले पाहिजे : ॲड. वैशाली डोळस

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** परिवर्तन कॉम्प्युटर्स व भारतीय महिला फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 76व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त विश्रांती चौक, जयभवानी नगर येथे ध्वजारोहण कार्यक्रमाप्रसंगी बोलत होत्या. परिवर्तन कॉम्प्युटर्स व भारतीय महिला फेडरेशन यांच्या वतीने विश्रांती चौक, जयभवानी नगर येथे ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित केला होता.

यावेळी ॲड वैशाली डोळस व डॉ शाहू चव्हाण यांच्या हस्ते महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबेडकर व शहीद भगत सिंग यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पांडुरंग ढोबळे, निलेश पाखरे, डॉ रामदास सपकाळ, संदीप शिंदे, मधुकर खिल्लारे, तुळशीराम खरात, बाबासाहेब जाधव, वसुधा कल्याणकर, माजी सैनिक कैलास मगारे, प्रा. प्रकाश कांबळे, ज्ञानेश्वर इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डोळस म्हणाल्या की, मुलींनी मेकअप आणि सेल्फीच्या मागे न धावता जिजाऊ, सावित्री यांचे विचार व कार्य समजून घेतले पाहिजे म्हणजे या सर्वां प्रमाणे त्यांचेही कर्तृत्व उजळून निघेल. देशातील स्त्रियांना देवीचे स्वरूप बहाल न करता त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे. मणिपूर सारख्या स्त्रियांचा अपमान करणाऱ्या घटनेवर देशातील प्रत्येकालाच चीड आली पाहिजे, मग ती स्त्री कोणत्याही धर्म किंवा जातीची असो. युनेस्कोचा अहवाल सांगतो की शिक्षणासाठी मुलांना मोबाईल ची गरज नाही. मुलांच्या हातातला मोबाईल काढून, पुस्तके द्या. स्वतः देखील मोबाईल मधे गुंग न होता वाचनाचा आदर्श मुलांसमोर ठेवावा. सगळे महापुरुष, विचारक आणि समाज सुधारक पुस्तके वाचूनच मोठे बनले व समाजातील अन्याय दूर



करू शकले. यावेळी डॉ. शाहू चव्हाण यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला रोहिणी चौरे व अस्मिता निर्वळ यांनी स्वागत गीत गायले. प्रतीक्षा पवार हिने अत्यंत सुंदर असे मनोगत व्यक्त केले. यावेळी उपस्थितांपैकी निलेश पाखरे, संदीप शिंदे, कॉ. संजय अंभोरे, डॉ रामदास सपकाळ यांनी शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले. प्रस्ताविक परिवर्तन कॉम्प्युटर्स चे संचालक कॉ मधुकर खिल्लारे यांनी केले. शिक्षक पात्रता परीक्षा TET मध्ये उर्दू विषयात राज्यातून पहिल्या आलेल्या मेहरूनिस्सा शाह तसेच प्रसिद्ध रांगोळी आर्टिस्ट कावेरी दळवी यांचा वैशाली डोळस व डॉ. शाहू चव्हाण यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय महिला फेडरेशन च्या राज्य सहसचिव कॉ. वसुधा कल्याणकर व सावीर वसुधा मधुकर यांनी वामनदादा कर्डक यांचे सांगा आम्हाला आमचा वाटा कुठं हाय हो हे गीत गायलं. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर केला. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ शाहू चव्हाण यांनी भारताचे संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कावेरी दळवी, कॉ संजय अंभोरे, शीतल पाटेकर, संतोष प्रधान, शकुंतला दांडगे, सुभाष साबळे, रवींद्र दांडगे, नवसाजी हनुमंते, चित्रा कुंटे, अस्मिता निर्वळ, समीक्षा काथार, सचिन साळवे, प्रतीक्षा पवार, मेहरूनिस्सा शाह, प्रियंका चव्हाण, भगवान देव्हारे, निवृत्ती कांबळे, संजय अंधारे,पवन श्रावणे, वैभव कैलकर, उत्कर्ष मस्के, सानिका तोंडे, रोहित दाभाडे, रोहन मीमरोट, धनश्री इंगळे,स्वराज माने, अंकिता किर्तीशाही, निकिता काळे, यांनी परिश्रम घेतले



# अन्न वाचवा समितीच्या वतीने पंचवीस हजारांच्या किराणाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अन्न वाचवा समितीच्या वतीने दैवत हया वृध्द लोकांच्या आश्रमात 25 हजारांच्या जीवनावश्यक किराणा सामानाचे वाटप करण्यात आले. तसेच अन्न वाचवा समितीच्या आवाहाना नुसार जाईंट गृप वाळूज यांच्या तरफे 20 खुर्च्या आणि महावीर इंटरनॅशनल मॅजिक विरा केंद्र यांच्या तरफे दोन डायनिंग टेबल देण्यात आले. दैवत आश्रम हा ग्रामीण भागात असून हया आश्रमात 30 आजारी वृध्द असून हया आश्रमाची आर्थिक परिस्थिती खूप बेताची असल्याने अन्न वाचवा समिती तरफे काही दानशूर व्यक्ती च्या सहकार्याने 25000 रूपयाचा जीवनावश्यक किराणा सामान वाटप करण्यात आले. वाटप करताना अन्न वाचवा समिती चे अनंत मोताळे, अशोक पोरे, नंदकुमार कुलकर्णी, लता कुलकर्णी आणि दिलीप असबे उपस्थित होते.

# नवरसाच्या नवकवितांनी कऱ्हेला साहित्याचा महापूर

आधुनिक केसरी न्यूज

**सासवड :** मनातल्या भावना शब्दांच्या चिमटीत पकडून कधी हशा तर कधी टाळ्या घेत रंगलेल्या कविसंमेलनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. नव् रसाच्या नव कवितांनी कऱ्हा नदीला जणू साहित्त्याचा महापूर आला होता, निमित्त होते रौप्यमहोत्सवी आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलनाचे , प्रेम, पाऊस, निसर्ग, हास्य, विडंबन, सामाजिक कवितांनी कऱ्हाकाठ मन्तरला. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखां सासवड यांच्या वतीने साहित्य संमेलन आयोजित केले जाते. ज्येष्ठ कवी बाबासाहेब सौदागर यांच्या अध्यक्षेतेखाली सुरु झालेल्या कविसंमेलनाची रंगत दशरथ यादव व हेमंत ताकवले यांच्या खुमासदार सुत्रसंचलनाने आणखी वाढली.

**अजुनी पाहा वाट जराशी**
**अछे दिन येणार आहेत**
**सारा देश विकल्यावर**
**आपण कुठे राहणार आहे**

ही दशरथ यादव यांची सद्य स्थितीत वर भाष्य करणारी अछे दिन कविता दाद मिळवून गेली. अरुण कटारे यांनी ती उपाशी झोपलेली लेकरे होती भिकारी ही ग़ज़ल सादर केली. तुझ्याच आसवांची नदी जिवंत आहे प्रेमा वरी तुझ्या या कवी जिवंत आहे ही राजेंद्र सोनवणे यांची कविता दाद मिळवून गेली. डॉ स्वाती शिदे/पवार, स्वाती बंगाळे, राज्गौरी जाधव, नीता सुभागडे, जगदीप वनशीव, वसंत पाटील, शुभानन, राजेंद्र सोनवणे, गोरक्ष जाधव, डॉ दत्ता सलगर, अनिल कदम, डॉ. रुता खांडेकर्, नसरीन अन्सारी, शरद पाडसे, शिवाजी झुरंगे, सुरेश धोत्रे, संजय सोनवणे, अशोक शर्मा, संजय जाधव, दत्ता पांढरे आदी कविनी कवित सादर केल्या. याप्रसंगी आमदार संजय जगताप यांनी चारोळी सादर करुन दाद मिळवली. यावेळी विजय कोलते, डॉ सागर देशपांडे, बाळासाहेब मुळीक, कलाताई फडतरे, प्रकाश खाडे, गंगाराम जाधव आदी उपस्थित होते.





# वामनदादा कर्डक यांना जयंतीनिमित्त अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचे महाकवी वामनदादा कर्डक यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. संजय नगर, मुकुंदवाडी येथे वामनदादा कर्डक यांच्या पुतळ्यास काँग्रेस पक्षाचे युवक नेते सुभाष पांडभरे पाटील व कॉम्रेड भास्कर लहाने यांनी वामनदादा कर्डक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

वामनदादा कर्डक यांनी आपल्या गीताच्या माध्यमातून दलित शोषित कष्टकरी शेतकरी शेतमजूर यांच्यावर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराचे विरोधात आवाज उठविला. समाजाची जागृती केली. समाजाचा प्रबोधन केल. त्यावेळी त्याकाळी समाजाच शोषण होत होत. तेव्हा वामनदादांनी सांगा धनाचा साठा आमचा वाटा कुठे हो, अशी गीतातून मांडणी केली. तर काँग्रेस पक्षाचे युवक नेते सुभाष पांडभरे पाटील म्हणाले की, वामनदादा कर्डक यांनी विविध विषयावर गीते लिहिली. समाजाच्या शोषणाच्या विरोधात आवाज उठविला.

समाज जागृती चे महत्वाचे काम केलं. म्हणून आजही वामनदादाच्या गीताला ऐतिहासिक महत्त्व आहे. मरावे परी कीर्ती उरावे, वामनदादा कर्डक आपल्या गीताच्या माध्यमातून, आपल्या विचाराच्या माध्यमातून आजही जिवंत आहेत. त्यांचा क्रांतीचा परिवर्तनाचा समतेचा विचार आपण सर्वांनी जिवंत ठेवण्याचा काम केलं पाहिजे, असे आवाहन पांडभरे पाटील यांनी केले. याप्रसंगी जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे यांनी वामनदादाच्या अनेक गीताचा संदर्भ देत, वामनदादांच्या गीतांनी जे समाजाचे प्रबोधन केले, त्याला तोड नाही, असं सांगितले.

याप्रसंगी मगरे अंकल, चंदू काळे , कारभारी वाहुळ, शाहीर सुरेश जाधव, देविदास येवले, शाहीर दिलीप मस्के, उत्तम पैकडे, लक्ष्मण कांबळे, प्रकाश निकाळजे ,जयदेव मस्के, रुस्तुम जाधव ,अनिल मस्के ,वामन थोरात, जमादार शिंदे, विद्या काकडे, सुभाष शुक्ला,तुकाराम साबळे,, यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील अनेक कवी गायक शाहीर उपस्थित होते. सम्यक विचार मंचचे अध्यक्ष अरुण जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकात वामनदादा कर्डक यांच्या जयंतीचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वतः अरुण जाधव यांनी केले तर आभार शाहीर सुरेश जाधव यांनी मानले.

# आत्मनिर्भर भारतासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहावे : प्रमोद सावंत

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** इंद्रराज महाविद्यालय सिल्लोड येथे 77 वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रोटरी क्लबचे असिस्टंट गव्हर्नर प्रमोद सावंत उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा अवलंब करून आत्मनिर्भर भारतासाठी प्रयत्नशील राहावे असे आवाहन केले. तसेच रोटरी क्लबच्या माध्यमातून विविध सामाजिक व देश हिताच्या कामे केली जातात त्याची त्यांनी माहिती दिली. यावेळी त्यांच्यासोबत रोटरी क्लबचे प्रेसिडेंट चंद्रकांत भयवाळ, डायरेक्टर भालचंद्र अत्रे व हसमुखभाई सोमय्या यासोबत या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सचिव अशोक देवरे, प्राचार्य डॉ. पी. पी. शर्मा, उपप्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब, फिजिकल डायरेक्टर डॉ.माधवसिंह इंगळे यासोबत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर




# सरपंच अनिता हेकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** स्वातंत्र्य दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय माळीवाडा येथे सरपंच अनिता सुधाकर हेकडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य कडू कीर्तिकर, कृष्णा मुळे, धम्मपाल गायकवाड, प्रवीण बर्डे, मनीष गाजरे, जिजाबाई भगत, ज्योती मुळे, कमलबाई आस्वार, मंदाकिनी कीर्तीकर, ग्रामविकास अधिकारी जी. व्हि. हारदे, पोलीस पाटील प्रमोद साठे, मुख्याध्यापक आदाने सर, गोरे सर शालेय समिती अध्यक्ष नंदकिशोर मुळे, माजी सैनिक सुखदेव खंडागळे, पत्रकार, शिवाजी आस्वार, माजी उपसरपंच भीमराज बर्डे, गावातील प्रतिष्ठित नागरिक सोमनाथ भगत, सुधाकर हेकडे, शेषराव गाजरे, नामदेव धनायत, रामेश्वर बाभळे, सोमनाथ साठे, सोमनाथ खजिनदार, नारायण वैष्णव, गोपीचंद कुंबरे, एकनाथ शिरसाट, शिवराम पन्हाळ, रमेश उदावंत, शिक्षक वृंद, अंगणवाडी ताई, आशाताई, गणेश अस्वार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसह गावातील नागरिकांची यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांचा बुडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्वातंत्र्य दिन सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात येत असतानाच जिल्ह्यातील पाच युवकांचा वेगवेगळ्या घटनांमध्ये बुडून मृत्यू झाला. भद्रावती येथील रितेश नथ्थू वानखडे (१८), आदर्श देवानंद नरवाडे (२०), रोहन डोंगरे, अविनाश पचारे, मंथन चिंचोलकर असे पाच मित्र सहज विरंगुळा म्हणून जुनाड येथे पोहोचले. वर्धा नदीच्या पुलावर बसले असताना संथ वाहणारी नदी बघून दोघांना नदीपात्रात उतरण्याचा मोह झाला. नदीत उतरले आणि पोहत असताना रितेश नथ्थु वानखडे, आदर्श देवानंद नरवाडे हे दोघे वाहून गेले. त्या दोघांचाही मृत्यू झाला.

चंद्रपूर येथील रहिवासी असलेले प्रविण सोमलकर (३६) व दिलीप कोसुरकर (४०) रा नायगाव असे आठ मित्र वणी तालुक्यातील नायगाव येथील वर्धा नदी परिसरात फिरायला गेले होते. वर्धा नदी पात्रात उतरले असता वाहून गेले. या दोघांचाही मृत्यू झाला. चंद्रपूर शहराजवळील दाताला येथील काही युवक अमलनाला धरणाजवळ फिरण्यासाठी आले होते, दुपारी दोन वाजताच्या सुमारास शुभम शंकर चिंचोळकर (३२) या युवकाने डॅमच्या वेस्ट वेअर पाण्यात उडी मारली. मात्र शुभमला खोलाचा अंदाज आला नसल्याने तो पाण्यात बुडाला. त्याचाही मृत्यू झाला.



## ज्ञानसागर वाचनालयात ध्वजारोहण

आधुनिक केसरी न्यूज

**छ. संभाजीनगर :** 15ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त ज्ञानसागर सार्वजनिक वाचनालय विठ्ठलनगर सिडको या ठिकाणी सकाळी आठ वाजता डॉक्टर महेंद्र खंदारे ,संचालक केअर हॉस्पिटल मुकुंदवाडी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष व्ही.सी. खपले सचिव भास्कर लहाने आणि सामाजिक कार्यकर्ते सुभाष पाटील पांढभरे उपस्थित होते. या प्रसंगी डॉक्टर खंदारे आपलं मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, देशामध्ये सध्या तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे याकडेही आपल्याला स्वातंत्र्य दिनानिमत्ताने लक्ष वेधने महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर देशाचा विकास सर्वसामान्य पर्यंत कसा पोहोचेल व त्यांना फायदा कसा होईल याचाही सजग नागरिकांनी विचार करणे गरजेचे आहे. तरच आपलं स्वातंत्र्य टिकून राहील. सुभाष पाटील पांढरे यांनीही आपल्या मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन भास्कर लहाने यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्या काकडे, अनिल मोरे, आदित्य लहाने, रामेश्वर सोनवणे यांनी परिश्रम घेतले. आर. एस. गवई,भीमराव आढाव, रत्नकर निकम,एस. बी. कोलते, डी. के. मस्के, जे.बी गायकवाड,श्रीमंत गायकवाड,विजय खरात, शैलेंद्र खैरनार, सुनील बाविस्कर, अशोक शिंदे, प्रकाश शिंदे,मनोहर शिंपी, प्रकाश चिमणकर, अशोक कुबडे,नाथा कुंटे, राठोड नानाभाऊ, अरुण जाधव,एम व्ही कदम,डी पी पळसकर, प्रकाश मालवणकर, नवनाथ जगताप, सुरेखा लहाने, कल्पणा खेडकर,शरद गायकवाड, मिलिंद काकडे, जगन्नाथ सोनाळकर, आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पतंजली योगपीठ परिवारातर्फे स्वातंत्र्यदिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** पतंजली योगपीठ परिवारातर्फे सकाळी 7.30 वाजता संकल्प यज्ञ करण्यात आला. सर्वांनी याप्रसंगी स्वदेशी वस्तू वापरण्याचा संकल्प केला. सकाळी 8.00 वाजता ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला. याप्रसंगी आदरणीय दत्तात्रय काळे, सौ उर्मिलाताई साजने यांनी मार्गदर्शन केले. श्रद्धेय स्वामी रामदेवजी महाराजांना नियमित योग करणारे योग साधक व नियमित योग करून घेणारे योग शिक्षक हे सर्वात प्रिय आहेत याचा उल्लेख वारंवार करतात असे सांगितले. सर्व पतंजली साधकांनी योगासन, प्रांतीय पहनावा, तसेच देशभक्ती गीताच्या संगीतावरती नृत्य केले. अल्पोपहारा नंतर कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

याप्रसंगी दत्तात्रय काळे, रावसाहेब साजने, राम शिवपनोर, हनुमंत ढगे, सुरेश लंगडापुरे, सिताराम सोनटक्के, आर जी जाधव, सुभाष जाधव, मुंजाजी जाधव, उद्धव चाबरकर, देविदास लाटकर, जनार्दन आठवले, अनिल कदम, सुनिता डांगे, मीनाक्षी चिल्लरगे, मंगला पाटील, दिगंबर क्षीरसागर, दिगंबर पाटील, सुफला बारडकर, शिवाजी पेन्शनवार, रामकृष्ण चक्रवार, अनिल कामिनवार, वसंतराव कल्याणकर, व्यंकटराव उतकर, जगन्नाथ येईलवाड, राधाबाई येईलवाड, सोपानराव मारकवाड, बापूराव हांडे, महानंदा माळगे, महारुद्र माळगे, उर्मिला साजने, चंदा हळदे, नंदकिशोर गबाळे, सविता गबाळे, नंदिनी चौधरी, स्वाती बेंबरे, संध्या उनग्रतवार, शशिकला भरणे, शुभांगी महात्मे, सोपानराव काळे, किशन भवर, हरिहर नरवाडे, सुरेखा घोगरे , प्रिया देशपांडे, मेघा चीटगोपेकर, शुभांगी महात्मे, ओवी देशपांडे, श्रेयस लंगडापुरे आदी मान्यवर उपस्थित होते. महारुद्र माळगे यांनी सूत्रसंचालन केले. सर्व पतंजली योगपीठ परिवार नांदेडच्या साधकांनी हे कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले, असे अनिल अमृतवार यांनी सांगितले



## राष्ट्रवादी विद्यार्थी आघाडी उपाध्यक्षपदी भूषण पाटील



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आदरणीय जयंत पाटील साहेब यांच्या मान्यतेने व राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस चे प्रदेशाध्यक्ष मा. सुनील गव्हाने यांच्या आदेशाने आणि राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस चे प्रदेश सरचिटणीस व धुळे जिल्हा निरीक्षक मा. वेदांशु पाटील राष्ट्रवादी काँग्रेस व पक्षाचे धुळे जिल्हाध्यक्ष मा. रणजित राजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली भुषण पाटील यांची राष्ट्रवादी विद्यार्थी कॉंग्रेस धुळे जिल्हाउपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे त्या ठिकाणी असंख्य पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भूषण पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. या ठिकाणी भूषण पाटील यांनी सांगितले की पक्षाच्या आदेशाने तन-मन-धन अर्पित करून एकनिष्ठ राहून जोरदार काम करील अशी ग्वाही दिली आहे.

